।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

दासराम ग्रंथमाला पुष्प ४७

# चैतन्यब्रह्म


अनिलप्रभू रामराय केळकर



– प्रकाशिका –

सौ. अपर्णा अनिलप्रभू केळकर

आवृत्ती पहिली सांगली इ. स. २०१३



■ **प्रकाशिका :**

सौ. अपर्णा अनिलप्रभू केळकर
घर क्र. ८२७, श्रीराम निकेतन,
श्रीबापुरावजी केळकर वाडा,
गांवभाग, सांगली ४१६४१६.
दूरभाष : (०२३३) २३०१९८६
भ्रमणध्वनी : ९८९०२२४१८६

■ **प्रथम आवृत्ती : इ.स.२०१३**

■ **मुद्रक :**

श्री प्रसाद ग्राफिक्स
तळमजला, चाफळकर कॉम्प्लेक्स,
गांवभाग, सांगली ४१६४१६.

■ **प्रसादमूल्य : रु. ३०/–**



■ **सर्व हक्क प्रकाशकाधीन**

## माझी भूमिका ....

आमचे घराण्याचे भाग्य, श्रीमारुतीरायांचे अवतार अशा श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे प्रेम - आशिर्वाद आमचे घराण्याला लाभले. श्रीमहाराजांचे माझे पणजोबा श्रीअंताजीपंत यांचेवर असणारे अतोनात प्रेम, माझे आजोबा श्रीमामामहाराज यांना प्राप्त झालेला आशिर्वाद, त्यांचे नित्यकीर्तनाची सुरुवात श्रीमहाराजांचे साक्षीने होणे, श्रीमहाराजांच्या उपदेशाप्रमाणे श्रीमामामहाराजांनी श्वासोच्छ्वासी नामोच्चरणी स्वच्छंद प्रयाण करणे, श्रीदासराममहाराजांना श्रीमहाराजांच्या रामनामी रंगलेल्या चिपळ्या प्राप्त होणे, या साऱ्या घटना, श्रीमहाराजांचे आमच्या घराण्यावर असणारे निरतिशय प्रेम दाखविणाऱ्याच आहेत ना ! नामसंकीर्तनी श्रीमहाराजांचे वास्तव्य असल्याने, नित्यकीर्तनाचे समयी आजही श्रीमहाराजांचे सान्निध्य, प्रेम आम्हास प्राप्त होत आहे. हे सारे जरी खरे असले तरी श्रीमहाराजच आमचे घरात श्रीदासराममहाराजांच्या रुपाने वावरत आहेत, याची जाणीव कधी आम्हाला झाली नाही. त्यांनी कधी होऊ पण दिली नाही.

श्रीदासराममहाराज हे श्रीमहाराजांचे अवतार आहेत याची जाणीव प्रथमतः श्री करंदीकरकाकूंच्या कन्या सौ. विजया अरविंद खाडिलकर यांना झाली. त्यांनी ही गोष्ट वारंवार त्यांचे व्याही ती.प.पू. आण्णा व मला सांगितली. श्रीमहाराजांचे चरित्र त्यादृष्टीने मी पुन्हा वाचले. श्रीमहाराजांचे चरित्रात व श्रीदासराममहाराजांचे चरित्रात खूपच साम्य आहे, असे मला आढळले. त्या दोघांचे जीवनातील ठळक साधर्म्य असणाऱ्या गोष्टी एकत्रितपणे पुस्तकरुपाने आपणासमोर चिंतनाकरिता ठेवण्यात आल्या आहेत, ते हे 'चैतन्यब्रह्म.'

देहाशी तादात्म्य असणाऱ्या आमच्या सारख्यांपेक्षा चैतन्याशी तादात्म्य असणारे महात्मे कसे वेगळे असतात, याची जाणीव 'चैतन्यब्रह्म' वाचल्यावर निश्चित होणारी आहे.

श्रीमहाराजांचे निर्वाणशताब्दी वर्षात त्यांचेच कृपेने ही अशी वाङ्मयीन सेवा माझेकडून व्हावी, हे माझे मोठे भाग्य मी समजतो. अशीच सेवा श्रीमहाराजांनी माझेकडून व आपल्या सर्वांकडून करून घ्यावी, ही प्रार्थना करतो.

हे पुस्तक साकार करणेचे कामी मला सौ. विजया अरविंद खाडिलकर, श्री. रमेशराव लाळे, श्री. नारायणराव देशपांडे, श्री. सुधाकरराव देगोडेकर यांचे सहकार्य लाभले आहे. त्यांना धन्यवाद !

'चैतन्यब्रह्म' या पुस्तकाचे पठणाने मला व आपल्या सर्वांना श्रीमहाराजांच्या चैतन्याची- चैतन्यब्रह्माची - श्रीमहाराजांची जाणीव सतत राहो अशीच प्रार्थना माझे सद्‌गुरु श्रीचैतन्यब्रह्म दासराममहाराज यांना करतो व त्यांचेच कृपेने स्फुरलेले व पूर्णत्वाला गेलेले हे 'चैतन्यब्रह्म', सद्‌गुरु ब्रह्मचैतन्यमहाराज यांचे पवित्र चरणी अर्पण करतो.

सांगली
दि. ७-१-२०१३ श्रीब्रह्मचैतन्यमहाराज पुण्यतिथी

**- अनिलप्रभू रामराय केळकर**

## प्रकाशिकेचे मनोगत ...

चैतन्यब्रह्माशी तादात्म्य असणाऱ्या श्रीब्रह्मचैतन्य महाराजांच्या व श्रीदासराम-महाराजांच्या जीवनात असणारे साधर्म्य दाखविणारे 'चैतन्यब्रह्म', श्रीब्रह्मचैतन्य-महाराजांच्या निर्वाण शताब्दी वर्षात प्रकाशित करताना मला फार आनंद होत आहे. अवतारमिमांसा करणारे असे हे पहिलेच पुस्तक असावे, असे मला वाटते. त्यांचे वागण्यातील एकरूपता, बोलण्यातील एकरूपता, विचारातील एकरूपता दाखविणारे त्यांचे चरित्रातील प्रसंग, श्रीदासराममहाराज हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे अवतार आहेत, हे दाखविण्यास पुरेसे आहेत.

माझे वडील ती. प. पू. बापूसाहेब पटवर्धन नोकरीचे निमित्ताने कागवाडला नवबागला, कागवाडकर सरकारांचे वाड्यातच रहात असल्याने सरकारांचेबरोबर श्रीब्रह्मानंदमहाराजांचे दर्शनाला व गोंदावल्यास श्रीमहाराजांचे दर्शनाला जाणे होई. साहजिकच श्रीमहाराजांचे आकर्षण माझे आईवडिलांना होते. माझी आई श्रीमती रजनी राजाराम पटवर्धन हीने तर श्रीमहाराजांचे समाधीवरून मंत्रोपदेश घेतलेला होता. ती त्यांचे पध्दतीप्रमाणे नामस्मरणही करीत असे. बरेच वर्ष मूल झाले नाही म्हणून त्यांनी श्रीमहाराजांची प्रार्थना केली व श्रीमहाराजांच्या आशिर्वादाने माझा जन्म झाला. ही गोष्ट वारंवार आई मला सांगत असे. जेव्हा माझे लग्न ठरले तेव्हा ती.प.पू. मामंजींनी माझ्या वडिलांना विचारले, ''हिचा जन्म श्रीमहाराजांचे कृपेने झाला आहे ना ?'' हा त्यांनी अचानकपणे विचारलेला प्रश्न ऐकून माझ्या वडिलांना आश्चर्यच वाटले व ते 'होय' म्हणाले. यावर ती.प.पू.मामंजी म्हणाले, ''बरोबर, म्हणूनच ती आमच्या घराण्यात सून म्हणून येणार आहे.''

माझा जन्म श्रीमहाराजांचे आशिर्वादाने झाला व लग्नानंतरचे सारे आयुष्य श्रीदासराममहाराजांच्या रुपाने श्रीमहाराजांचे सान्निध्यात गेले. पुढे श्रीदासराममहाराजांचा अनुग्रह-आशिर्वादही मला प्राप्त झाला. म्हणून महाराजांचे व श्रीदासराममहाराजांचे गुणवैशिष्ट्ये दाखविणारे हे 'चैतन्यब्रह्म' प्रकाशित करताना मला वेगळाच आनंद होत आहे.

हे पुस्तक निर्दोष स्वरुपात प्रसिध्द व्हावे म्हणून श्रीदासराममहाराजांचेवर निष्ठा असणारे श्री.रमेशकाका लाळे यांनी अपार कष्ट घेतले आहेत. मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे. या पुस्तकाचे मुद्रण अत्यंत आपुलकीने व सुबकपणे करण्याचे काम श्री प्रसाद ग्राफिक्सचे श्री. प्रसाद पटवर्धन यांनी केले आहे. त्यांना शतशः धन्यवाद.

श्रीमहाराजांचे व श्रीदासराममहाराजांचे आशिर्वाद मला आपणा सर्वांना असेच प्राप्त व्हावेत ही प्रार्थना करते व येथेच थांबते.

सांगली
दि. ७/१/२०१३ श्रीब्रह्मचैतन्यमहाराज पुण्यतिथी

**- सौ. अपर्णा अनिलप्रभू केळकर**

## तेचि सद्‌गुरु चैतन्यब्रह्म ...

साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरुपी मिळाले॥
अवघे मिळोनी एकचि झाले। देहातीत वस्तू॥

**- श्रीसमर्थ**

ते महात्मे देहातीत असतात, वस्तूरुप असतात, **''साधु वस्तू होऊन ठेला। संशय ब्रह्मांडा बाहेरी गेला॥''** वस्तु म्हणजे चैतन्य आहे - तेच ब्रह्मचैतन्य होतात.**''ब्रह्मस्वरूप चैतन्य। ते हे सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य॥''** असे माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर म्हणतात. तर **''चैतन्यस्वरूप ते ब्रह्म। तेचि सद्‌गुरु चैतन्यब्रह्म॥''** असे माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर हे होते.

आमची कन्या सौ. अंजनी भूषण खाडिलकर हिच्या सासूबाई सौ. विजयाताई अरविंदराव खाडिलकर या तर नेहमी म्हणतात की आमचे प.पू.दासराममहाराज केळकर हे श्रीब्रह्मचैतन्य महाराजच आहेत. तर श्रीराम निकेतन हे गोंदवले आहे. हे सारे आम्ही ऐकायचे आणि तो विषय तसाच रहायचा.

पण माझे बंधुवर्य व गुरुबंधू श्री. अनिलप्रभू रामराय केळकर यांनी 'चैतन्यब्रह्म'' हा ग्रंथ लिहून त्यामध्ये श्रीब्रह्मचैतन्य महाराज व श्रीदासराममहाराज यांच्या जीवनामध्ये किती साम्य आहे हे सोदाहरण दाखवून दिले आहे. त्यामुळे सौ. विजयाताई खाडिलकर म्हणतात ती गोष्ट पटल्याशिवाय रहात नाही. दोघेही महात्मे चैतन्यरूप आहेत हे शेवटी खरे आहे.

यामुळे चैतन्यब्रह्म या ग्रंथाला फार मोठे महत्व आहे. त्यामुळे श्री. अनिलप्रभू केळकर यांचे उपकार जे जे कोणी श्रीदासराममहाराजांचे आहेत, श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे आहेत पण आमच्या श्रीदासराममहाराजांच्यावर नितांत श्रध्दा आहे, त्यांचेवर आहेत. अशीच स्फूर्ती त्यांचे ठिकाणी या चैतन्यब्रह्मांच्या व ब्रह्मचैतन्यांच्या कृपेने सतत वर्धिष्णु होत रहावी व त्यांचे हातून असेच चढते, वाढते कार्य व्हावे, अशी माझी भगवान श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे चरणी शतशः प्रार्थना आहे.

शेवटी भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू.श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी अनेक प्रणिपात.

श्रीसद्‌गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराज व श्रीसद्‌गुरु श्रीब्रह्मानंदमहाराज यांचे चरणी दंडवत!

''राजाधिराज श्रीसद्‌गुरुनाथ महाराज की जय॥''

सांगली
१३/१/२०१३

**श्रीदादांचा कृपाभिलाषी**
**चंद्रशेखर**
**(चंद्रशेखर रामराय केळकर)**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| सज्जन यासाठी यासाठी। अवतरले या सृष्टी | १ |
| रामदासी जैसा भाव। तैसा झाला पंढरीराव | ३ |
| धन्य जगी या गुरुवर्य हे मारुती अवतार | ७ |
| संतदर्शनी हा लाभ | ११ |
| आशिर्वाद सज्जनांचा नाही फुकट जायचा | १५ |
| बालपणीच सर्वज्ञता। वरी तयाते | २० |
| भेद हा तुटे अभेद उमटे। राम प्रगटे तेचि नवमी | २३ |
| आपणासारखे करिती तात्काळ | २४ |
| जो चिंतिना देहभरण | २५ |
| पतिचिया मता। अनुसरोनी पतिव्रता | २७ |
| हरिभक्त विरक्त | ३१ |
| न गुरोर अधिकं | ३२ |
| मंगलधामी या झालो जंगम आम्ही | ३३ |
| सुखे येतो घरा नारायण | ३५ |
| तुका म्हणे पोते। देव भरले नोहे रिते | ३७ |
| गुरुवाक्यावाचुनि शास्त्र। हाती न शिवे | ३९ |
| सर्व प्रेमामाजी थोर मातृप्रेम | ४० |
| जेथे राम उभा वाचवाया | ४५ |
| अलौकीक नोहावे लोकांप्रती | ४८ |
| कथाश्रवणे नाना कष्ट। संदेह मावळती | ४९ |
| दया करणे जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी | ५० |
| अधिकार तैसा करू उपदेश | ५२ |
| समर्थाचिया पंक्तिभोजने। तळल्या, वरल्या एकचि पक्वान्ने | ५३ |
| राम कर्ता | ५४ |
| शरण जावे इतरा। ते काय देणार | ५५ |
| दार घराचे सदैव उघडे। भागवताची ध्वजा फडफडे | ५७ |
| विषय तो त्यांचा झाला नारायण | ५८ |
| सद्‌गुरुंचे पाय सेवावे सद्‌गतीकारणे | ५९ |
| जो आत्मलाभासारखे गोमटे काहीच न देखे | ६० |
| कृतकृत्य झालो। इच्छा केली ते पावलो | ६१ |
| मरण माझे मरुनी गेले। मग मी झालो अमर | ६२ |
| प्रेम नये सांगता, बोलता, दाविता | ६७ |
| चैतन्यब्रह्म | ७१ |
| रामदास ते दासराम ते। मूर्ती चैतन्याची | ७४ |
| महाराज धन्य आजि जहालो हो। प्रभू आपल्या दर्शने | ८४ |
| आरती | ८६ |

## सज्जन यासाठी यासाठी। अवतरले या सृष्टी ।।

जेव्हा धर्माला ग्लानी येते, जेव्हा अधर्म हाच माणसाचा धर्म होतो, जेव्हा असत्य हेच सत्य वाटू लागते, जेव्हा अनितीने वागणे हीच निती ठरते, जेव्हा रावणासारखी, कंसासारखी राक्षस प्रवृत्तीची माणसे, राजे म्हणून प्रजेचा छळ करतात, तेव्हा स्वत: भगवान परब्रह्म, रामकृष्णासारखे अवतार घेतात व ही राक्षसी प्रवृत्ती नष्ट करुन धर्माला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त करुन देतात. भगवंतानी तसे आश्वासनच आपणांस दिलेले आहे. भगवान सांगतात,

**''यदा यदा हि धर्मस्य, ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।**
**परित्राणाय साधूनाम् विनाशाय दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।८ ।। ''**

पण हे अवतार, तसे जबरदस्त कारण असेल तरच होतात. आमचे श्रीदादा-श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगायचे, राज्यकर्ते जेव्हा हे कीर्तनकार बैलगाडीला कामासाठी जुंपतील, येवढे टोकाचे जेव्हा अत्याचार होतील तेव्हा भगवंताचा अवतार निश्चित होईल.' रामकृष्णासारखे पाण्याचे बर्फ व्हावे असे अयोनिसंभव अवतार काही मोजकेच. या अवतारांचे वर्णन सुभाषितकार असे करतात,

**''कृते जनार्दन देवो । त्रेतायां रघुनंदन: ।**
**द्वापारे रामकृष्णश्च । कलौ श्रीपादवल्लभं ।।''**

जेव्हा धर्म मूळ तत्वापासून बाजूला सरतो, जेव्हा धर्मातील आत्माच नष्ट होतो, जेव्हा धर्मातील गाभा-आत्मा, त्याचे महत्व नाहिसे होऊन, धर्माच्या बाह्याचारालाच महत्व प्राप्त होते, तेव्हा वैकुंठवासी असणारे भगवान पुन: मानवी





रुपात अवतीर्ण होतात. प्राचीन काळी त्यांना 'ऋषी' असे संबोधिले जाई. तर सद्यस्थितीत त्यांना 'संत-साधू' या नावाने ओळखले जाते. या संतांचे वर्णन श्रीज्ञानेश्वर महाराज असे करतात,

**''आत्मज्ञाने चोखडी । संत जे माझी रुपडी ।**
**तेथ दृष्टी पडो आवडी । कामिनी जैसी ।।''**

तर समर्थ या संतांना 'धर्मस्थापनेचे नर' असे उल्लेखितात.

**''धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।**
**जाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे ।''**

धर्म कसा आचरावा, परमार्थाचे आचरण कसे करावे, हे दाखविण्यासाठी या संतांचे अवतार असतात.

**'' धर्माचे पालन । करणे पाखंड खंडण । हेची आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम।। ''** व **''आम्ही वैकुंठवासी। आलो याची कारणासी। बोलिले जे ऋषी। साच भावे वर्ताया।।''** ही श्रीतुकाराममहाराजांची वचने व **''धर्माच्या करिता आम्हास जगती रामाने धाडियले। ऐसे जाणूनी रामभक्ती करिता ऐश्वर्य हे लाधले।।''** हे समर्थवचन, ही संतवचने, संतांचे अवतारामागील असणारा हेतू स्पष्ट करणारीच आहेत. अबोलण्याचे बोलणे असे जे नाम आहे, ते कसे बोलायचे, हे दाखविण्यासाठी, जो परमात्मा या विश्वाचे मागे दडलेला आहे, म्हणून हे विश्व भासमान होते आहे, असा न दिसणारा गुह्य परमात्मा प्रगट करून दाखविण्यासाठी, या सज्जन संतांचा अवतार असतो.

**''सज्जन यासाठी यासाठी । अवतरले या सृष्टी ।**
**अबोलणे बोलावे । न दिसे दृष्टी ते दावावे ।।**

**- उद्धवचिद्घन**

## रामदासी जैसा भाव। तैसा झाला पंढरीराव।।

'धर्मस्थापनेचे नर' अशा समर्थ भाषेत, समर्थशब्दात ज्यांचे वर्णन करता येईल, असे ईश्वराचे अवतार 'श्रीदासराममहाराज' हे होते. कोणत्या धर्माची स्थापना त्यांनी केली होती ? आपण जरी ज्या धर्माकडे दुर्लक्ष केले, तरी जो धर्म आपणाकडे दुर्लक्ष करीत नाही, अशा सांगातीच्या धर्माची त्यांनी स्थापना केली होती. त्यांचा ज्याच्यावर आपली धारणा आहे, असा आत्माराम हा धर्म होता, तर आत्माराम प्रगट करणारे नामी नाम आचरणे, हा त्या धर्माचा सदाचार होता. अशा सर्वसमावेशक विश्वधर्माची स्थापना करणारे धर्मसंस्थापक श्रीदासराममहाराज हे होते.

श्रीदासराममहाराजांच्या अवताराचे भाकीत त्यांच्या अवतारापूर्वीच श्रीवजीरबाबा या अवलिया संतांनी वर्तविले होते. भक्त प्रल्हादाप्रमाणे आईचे उदरातच श्रीदासराममहाराजांना भ.स.श्री तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा अनुग्रह प्राप्त झाला. पुढे श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे आशिर्वादाप्रमाणे श्रीदासराममहाराज हे वयाच्या ५ व्या वर्षीपासूनच ब्रह्म व माया अशा गूढ विषयावर कीर्तन करू लागले. सातव्या वर्षीच त्यांना आत्मयाची काव्यस्फूर्ती झाली. त्यांना 'गुरूचा पंखा' हे पहिले पद स्फुरले. वयाच्या ९ व्या वर्षीच त्यांनी 'रामदासबोध' हा १६९ ओव्यांचा ग्रंथ श्रीरामानंदमहाराज खटावकर यांचे सूचनेवरून लिहिला. हे सारे उपजत असणारे भगवद्प्रेम पाहून श्रीदासराममहाराजांना, श्रीरामानंदमहाराज 'प्रल्हाद' या नावाने संबोधू लागले. शालेय जीवनातसुध्दा त्यांनी शालेय अभ्यासाबरोबर अध्यात्मिक अभ्यास केलेला आढळतो. अनेक अभंग, उध्दवरावजीमहाराजांचे चरित्र, 'आत्मसुधा' हे अध्यात्मिक प्रकरण त्यांनी शालेय जीवनातच लिहिले आहे.

श्रीदासराममहाराजांना अध्यात्मिक अभ्यास करताना आलेल्या काही



चैतन्यब्रह्म

शंकांचे निरसन भ.स.श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे अधिकारी नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज यांनी केले व उर्वरीत शंकांचे निरसन स्वत: श्रीनिंबरगीकरमहाराजच करतील असे आश्वासन त्यांनी श्रीदासराममहाराजांना दिले. श्रीनागाप्पाण्णामहाराजांच्या वचनाप्रमाणे भ.स.निंबरगीकरमहाराज यांनी देह ठेवल्यापासून पन्नास बावन्न वर्षांनी प्रत्यक्ष प्रगट होऊन, श्रीदासराममहाराज यांना 'श्रीगुरुलिंगगीता' श्रुत करून उर्वरीत शंकांचे निवारण केले. या श्रीगुरुलिंगगीतेत खूप ठिकाणी श्रीदासराममहाराजांना 'प्रल्हाद' असे संबोधिले आहे. म्हणून श्रीदासराममहाराज हे भक्त प्रल्हादाचे अवतार ठरतात.

भ.स.निंबरगीकरमहाराज हेही भक्त प्रल्हादाचे अवतार आहेत असे भ.स.श्रीतात्यासाहेब महाराज कोटणीस यांनी त्यांचे एका पदात नमूद केले आहे. ते पद असे,

**''मूळ प्रल्हाद तेचि अंगद उध्दव पुढे जगती ।।**
**नामदेव मग तुकारामची पूर्ण ब्रह्मज्योती ।**
**अवतारी या नाम नारायणराव हे धरियेले ।**
**गुरुलिंगजंगमसाधू ऐसे प्रगट जन बोले ।।''**

श्रीनिंबरगीकरमहाराज हेही प्रल्हादाचे अवतार व श्रीदासराममहाराज हेही प्रल्हादाचेच अवतार, म्हणून श्रीदासराममहाराज हे श्रीनिंबरगीकरमहाराजांचे अवतारही ठरतात.

श्रीदासराममहाराजांचेकडून श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अप्रसिध्द अवघड अशा वाङ्मयावर टिकात्मक लेखन झाले. ज्याच्यावर कोणाचेही भाष्य नाही, अशा श्रीज्ञानदेवतेहत्तीशी, श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, श्रीज्ञानदेवआज्ञापत्र आदी ग्रंथांवर श्रीदासराममहाराजांच्या विस्तृत टिका उपलब्ध आहेत, म्हणून श्रीदासराममहाराजांना 'ज्ञानमार्गीची विमानवाहतूक' या शब्दात

सद्गुरुपंतमहाराजांचे अधिकारी शिष्य प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर गौरवितात.

'उपजताची ज्ञानी' असणारे श्रीदासराममहाराज हे काही लोकांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे रूपात दिसतात, तर भक्तांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे श्रीदासराममहाराज हे काही लोकांना स्वामी समर्थांचे रूपात दिसतात, तर करुणेचे सागर असणारे श्रीदासराममहाराज हे काहींना श्रीसाईबाबांचे रूपात दिसतात, तर सहजावस्थेत असणारे श्रीदासराममहाराज काहीं श्रीरामकृष्ण परमहंसांचे रूपात पाहतात, तर चैतन्यरूप असणारे श्रीदासराममहाराज काहींना श्रीब्रह्मचैतन्यांचे रूपात दिसतात, सोहंहंसारूढ असणारे श्रीदासराममहाराज काहींना स्वामीस्वरूपानंदांचे रूपात दिसतात.

**''साधू दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ।**
**अवघे मिळोन येकचि जाले । देहातीत वस्तू ।।''**

या समर्थवचनाप्रमाणे स्वरूपाकार झालेल्या श्रीदासराममहाराजांचे ठिकाणी सर्व साधूंचे ऐक्य अनुभवाला येत होते.

**''रामदासी जैसा भाव । तैसा झाला पंढरीराव ।।''**

हा श्रीरामदासस्वामींचा अनुभव श्रीदासराममहाराजांचे बाबतीत त्यांचे भक्तांना येत असे. भक्तांचे मनातील भाव ओळखून त्या त्या रूपात भक्तांना श्रीदासराममहाराज दर्शन देत व भक्तांचे समाधान करीत, हे जरी खरे असले तरी चरित्रातील साधर्म्य, विचारातील साधर्म्य, आचारातील साधर्म्य पाहिले असता श्रीदासराममहाराज हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे अवतारच वाटतात.

याची जाणीव प्रथमत: श्रीदासराममहाराजांचे कृपेतील आमच्या सौ.खाडिलकरकाकू-सौ. विजया अरविंद खाडिलकर-पूर्वाश्रमीच्या विजया





श्रीधर करंदीकर-आमच्या करंदीकरकाकूंच्या कन्या, यांना झाली. श्रीमती करंदीकरकाकू या सद्गुरुभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांच्या अनुग्रहित होत्या. त्यांची श्रीमामामहाराजांचेवर तसेच श्रीदासराममहाराजांचेवर अतिव निष्ठा होती. माझी आजी-सौ. इंदिरादेवी, त्यांना आपली बहीणच मानी. त्यांनी नित्य कीर्तनश्रवण कधीही सोडले नाही. प्रतिवर्षी त्यांच्या करंदीकर वाड्यात त्या श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांच्या पादुका स्थापनेचा वाढदिवस श्रीदासराममहाराज यांचे उपस्थितीत अश्विन वद्य पंचमी या दिवशी साजरा करीत. त्यांचेकडूनच हा अध्यात्मिक वारसा त्यांच्या कन्या सौ. विजया अरविंद खाडिलकर यांना प्राप्त झाला आहे. त्यांचीही त्यांचेप्रमाणेच श्रीमामामहाराजांचेवर, श्रीदासराममहाराजांचेवर अतिव निष्ठा आहे. त्यांनी श्रीदासराममहाराजांचे चरित्र जवळून पाहिले आहे. त्यामुळे साहजिकच श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे चरित्र वाचताना त्यांचे डोळ्यासमोर श्रीदासराममहाराजच उभे राहू लागले. ही गोष्ट त्यांनी वारंवार त्यांचे व्याही ती. प.पू. आण्णांना व मला सांगितली. श्रीमहाराजांचे चरित्र त्या दृष्टीने पुन्हा मी वाचले. श्रीमहाराजांचे चरित्रात व श्रीदासराममहाराजांचे चरित्रात खूपच साम्य आहे, असे मला आढळले.

विषयाचे प्रतिपादनार्थ त्यातील ठळक प्रसंग आपणासमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. ते पाहून आपणासही श्रीदासराममहाराज व श्रीमहाराज हे कसे एकरूप होते, हे जाणवल्याशिवाय राहणार नाही.

卐

## धन्य जगी या गुरुवर्य हे मारूती अवतार।।

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे अंतरंगातील एक शिष्य श्रीहरिपंत मास्तर यांना श्रीमहाराजांनी सांगलीला आपले घरी यावे, त्यांच्या पदस्पर्शाने आपली वास्तू पुनीत व्हावी, असे वाटे. त्यांनी वारंवार श्रीमहाराजांना आपल्या घरी येण्याबद्दल विनविले. पण श्रीमहाराजांचे काही सांगलीला येणे झाले नाही. श्रीमहाराज मिरजेला आले, कागवाडला आले, पण ते सांगलीला आले नाहीत, याची रुखरुख श्रीहरिपंतमास्तरांना लागून राहिली. त्यांनी शेवटी नाईलाजाने, धाडसाने श्रीमहाराजांना सांगलीला न येण्याचे कारण विचारले. तेव्हा श्रीमहाराज म्हणाले, ''हरिपंत, सांगलीला जे नित्यकीर्तन करतात, ते श्रीहणमंतरावजी कोटणीसमहाराज व मी काही वेगळे नाही आहोत. ते आणि आम्ही एकरूपच आहोत. ते तुमच्या घरी आले किंवा तुम्ही त्यांच्या घरी कीर्तनश्रवणास गेलात, की मला भेटल्यासारखेच होणार आहे.'' हा खुलासा ऐकून मास्तरांना काय समजायचे ते समजले. त्यांचे मनाचे समाधान झाले.

श्रीरामदासस्वामी, श्रीब्रह्मचैतन्यमहाराज व श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे तिघेही श्रीमारुतीरायांचे अवतारच मानले जातात. तिघांनीही श्रीमारुतीरायांप्रमाणे केलेली श्रीरामभक्ती, श्रीरामाची उपासना हे त्याचेच द्योतक आहे. श्रीरामदासस्वामींना प्रत्यक्ष प्रभूरामचंद्रांचा अनुग्रह, तर श्रीब्रह्मचैतन्य महाराजांना श्रीतुकाराम, जे 'श्रीतुकामाई' या टोपणनावाने ओळखले जात, यांचा अनुग्रह, तर श्रीतात्यासाहेबमहाराजांना चिमडच्या श्रीरामचंद्ररावजी यरगट्टीकर महाराजांचा अनुग्रह. तिघांचेही सद्‌गुरु 'राम'च हे येथे विशेष आहे. तिघांचाही स्वरूप संप्रदाय, ज्यात स्वरूपाचा साक्षात्कार प्रमाण मानला जातो. तिघांनीही श्वासोच्छ्वासी असणारे नाम जपले आणि जपले. समर्थ म्हणतात, ''नाम श्वासोच्छ्वासी असे। परब्रह्म तेथे वसे' तर श्रीब्रह्मचैतन्य महाराज त्यांचे





अभंगगाथेत ठिकठिकाणी या श्वासोच्छ्वासी असणाऱ्या नामाचा उल्लेख करतात. ते अभंग खालीलप्रमाणे,

१) **सर्व सोडोनिया आस । राम जपा श्वासोच्छ्वास ।**
**तेणे तरसील खास । स्वामीवचन हे ।।**

२) **न लगे मानवाची आस । जपा नाम श्वासोच्छ्वास ।।**

३) **नाम श्वासोच्छ्वासी वसे । तेथे ब्रह्म उभे असे ।।**

४) **नका करू हो आळस । राम जपा श्वासोच्छ्वास ।।**

५) **नका धरू काही आस । राम जपा श्वासोच्छ्वास ।।**

तर श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस या सोहंहंसाचे महत्व असे सांगतात,

**''हंसावरी राम बैसोनी चालिले हो पुढती ।**
**हंस कसा मग उड्डाण करतो खाली आणि वरती ।।१ ।।**
**खाली येता सवे उडतसे कोण जाणे गती ।**
**प्राणी निजला तरी हंस हा न सोडी निज स्थिती ।।२ ।।**
**हंस गगनीच्या मुक्तामाळा देई आणुनी हाती ।**
**अगणित तारे त्यात चमकती नाना रंग ज्योती ।।३ ।।**
**डोळे झाकुनी पाहसी जरी तू स्वरूप दिसे पाही ।**
**बाप सद्‌गुरु कृपा करील हा लाभ घडे देही ।।४ ।।**

या अखंडीतवाचेने केलेले श्रीरामाचे अखंडीतस्मरण हेच त्यांचे नित्यकीर्तन होते. ते म्हणतात, ''**अखंडीत वाचे श्रीरामस्मरण । हेचि पै कीर्तन दासालागी ।।**''

श्रीरामदासस्वामी हे श्रीमारुतीरायांचे अवतार होते, असा अनुभव श्रीरामदासस्वामींचे अधिकारी शिष्य कल्याणस्वामी असा नोंदवितात,

**''साक्षात शंकराचा । अवतार मारूती ।**
**कलिमाजी तेचि झाली । रामदासाची मूर्ति ।।''**

असाच अनुभव श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे बाबतीत त्यांचेच अधिकारी शिष्य ब्रह्मानंदमहाराज असा व्यक्त करतात,

**''माझे सद्गुरुराव मारुती अवतार ।**
**कोणी हो संदेह धरू नये ।।**
**दया ती पहावी सद्गुरुनाथाची ।**
**समर्थाचे परी शोभतसे ।।''**

श्रीतात्यासाहेबमहाराज यांचेबाबतीत हाच अनुभव सद्गुरु पंतमहाराज बाळेकुंद्री यांचे अधिकारी शिष्य प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर आपले पदात असा नोंदवितात,

**''त्रेतायुगी हनुमंते सेवा रामाची केली ।**
**नैष्ठिक ब्रह्मचर्य आचरुनी किर्ती गाजविली ।।धृ ।।**
**रामावाचुनी अन्य नावडे एकदेशी जाहला ।**
**सर्व जग हे रामरुपची मानेना बोला ।।१ ।।**
**त्रेतांती श्रीहनुमंताने राम प्रार्थियला ।**
**संसाराचा अनुभव काही नाही मज मिळला ।।२ ।।**
**सर्वदेशी तुज अन्वयदृष्टी कैसे सेवावे ।**
**आपण तरुनी इतरजनांना कैसे तारावे ।।३ ।।**
**राम म्हणे कलियुगात मानव होऊनी कार्य करी ।**
**रामदास गोंदविले बाबा आवृत्ती दुसरी ।।४ ।।**





**कोटणीस आवृत्ती तिसरी रामप्रसादाने ।**
**जना डुलविले आपण डुलला कीर्तनरंगाने ।।५ ।।**
**दत्तगुरुकृपे पांडुरंगमनी अपार कवतूक ।**
**ज्ञानमार्गीची 'राम केळकर' विमान वाहतूक ।।६ ।।**

आपण अंजनीनंदन हनुमान असल्याचे अनाहूतपणे श्रीतात्यासाहेब महाराज आपले एका पदात असे सांगतात,

**''ऐशा बळीवंताचे पायी पै नमन ।**
**अंजनीनंदन करीतसे ।।''**

श्रीब्रह्मचैतन्य महाराज व श्रीतात्यासाहेबमहाराज हे दोघेही मारुतीरायांचे अवतारच असल्याने 'मी व श्रीहणमंतराव कोटणीसमहाराज काही वेगळे नाही आहोत' हे श्रीमहाराजांचे सांगणे पटल्याशिवाय रहात नाही.

मारुती अवतार असणाऱ्या श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी, श्रीकोटणीस महाराजांनी प्रभू रामाचे कार्य करून – प्रभूसेवा करून धन्यता प्राप्त करून घेतली.

**'धन्य जगी या गुरुवर्य हे मारुती अवतार.'**

卐

## संतदर्शनी हा लाभ

श्रीदासराममहाराजांचे आजोबा श्रीअंताजीपंत हे एक अध्यात्मप्रेमी गृहस्थ होते. संतांचे दर्शन घेणे, त्यांची सेवा करणे, त्यांचा आशिर्वाद घेणे, हा त्यांचा स्वभाव होता. त्यांचे संतांचेवर प्रेम होते व संतांचेही प्रेम त्यांचेवर होते. दत्तावतार श्रीटेंबेस्वामी व त्यांचेच अधिकारी शिष्य श्री दिक्षीतस्वामी यांचे दर्शनास ते जात. त्यांनी अत्यंत प्रेमाने त्यांना एकेक रुपया प्रसाद म्हणून भेट दिला होता. ते प्रसादधन त्यांनी प्राणापलिकडे जतन करून ठेवले. या धनाचीच – लक्ष्मीचीच – पूजा दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजनादिवशी आजही या केळकर घराण्यात केली जाते.

सांगलीतच राहणाऱ्या श्रीलक्ष्मण दिक्षीतमहाराज या शिवभक्त सत्पुरुषांचेकडून त्यांनी पार्थिवपूजेचे व्रत स्वीकारले होते. ते शंकराचा १२ हजार जप, पार्थिवपूजा, सोमवारचा उपवास अशी उपासना नेमाने करीत. या श्रीलक्ष्मण दिक्षीतांची त्यांचे उतारवयात त्यांनी हालहाल सेवा केली. त्यांचे निर्याणानंतर त्यांची समाधीही विष्णू घाटावर त्यांनी बांधविली.

श्रीअंताजीपंतांच्या द्वितीय पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांना श्रीब्रह्मचैतन्य महाराजांचा अनुग्रह होता. श्रीअंताजीपंतांनी खूप लवकर नोकरीतून स्वेच्छा निवृत्ती घेतलेली होती. त्यामुळे श्रीमहाराजांचे दर्शनासाठी सौ.लक्ष्मीबाईंचेबरोबर तेही वारंवार गोंदवल्यास जात. श्रीअंताजीपंतांची नित्य उपासना पाहून श्रीमहाराजांचे प्रेम त्यांना प्राप्त झाले. श्रीमहाराज त्यांना आग्रह करून गोंदवल्यास ठेवून घेत. श्रीमहाराजांचेपाशी त्यांना आलेला अनुभव, त्यांना मिळालेले प्रेम त्यांनी एका पदात व्यक्त केले आहे. ते पद असे,

**‘गोंदवलीची माझी आई कोठे मी पाहू,**
**तद्विरहे जीव व्याकूळ होतो कैसा मी राहू ।।धृ।।**





**काय प्रेम हे गुरुमायेचे न बोलवे वाचा ।**
**अनन्य होता प्रेमपान्हा नावरेचि तिचा ।।१ ।।**
**किती मधूर ते बोल गोमटे तृप्ती न कधी होई ।**
**सदा मिळावे ऐसी इच्छा श्रोत्रद्वयी राही ।।२ ।।**
**निरहंकृतीचे सदा बोलणे सहजची उपदेश ।**
**शुध्द भाविका हृदया बाणूनी फिटती संदेह ।।३ ।।**
**अति कनवाळू गुरुमायही जननीहूनी गाढी ।**
**नामामृत ते प्राशन करुनी भवबंधा तोडी ।।४ ।।**
**अमितपुत्र आणि तशा कन्यका प्रसवे ही माय ।**
**या सर्वांचे कृपाकटाक्षे रक्षण ते होय ।।५ ।।**
**श्रमुनी भागुनी मुलामुलींनी या माहेरा यावे ।**
**अगत्यांनी गौरवुनी त्या येऊनीया ध्यावे ।।६ ।।**
**नित्यक्रम हा असाची चाले या मायेघरचा ।**
**अगत्य गौरव वाढत जाई अनुभव सर्वांचा ।।७ ।।**
**आपल्या पंक्तित घेऊनी त्यांचा पुरवावा हेत ।**
**काय सोहळा त्या प्रेमाचा देहभावरहित ।।८ ।।**
**सांप्रदाइकाहूनी इतरावरी प्रेम खूण राही ।**
**लहानथोर हा भेद न तेथे सर्वा समता ही ।।९ ।।**
**किती काल हा जाता लव क्षण इतुकाची वाटे ।**
**माय निरुपणी प्रेमानंद सबाह्य तो दाटे ।।१० ।।**
**अशा आनंदामध्ये बहुदिन येऊनीया ध्यावे ।**
**मागुती जाण्या आज्ञा मागता कौतुक करावे ।।११ ।।**

**आज उद्या हे बहुदिन चाले काय शुध्द प्रेमा ।**
**अनुभवी असती त्यांच्या भाग्या जाहली असे सीमा ।।१२ ।।**
**फराळाचे करूनी देऊनी आज्ञा ही द्यावी ।**
**निघता नमना आल्यावरती वस्ती करवावी ।।१३ ।।**
**इच्छित श्रवण पुन्हा करवुनी नामगजर होती ।**
**माय समागमी रघुपती स्मरणी त्रिविध ताप हरती ।।१४ ।।**
**अशा परीने  निजबाळाचे कौतुक करी माय ।**
**स्मरण हे होता कंठ दाटुनी वृत्ती स्तब्ध होय ।।१५ ।।**
**अखंड कंठी नाम धरावे श्रीराम जयराम जयजयराम ।**
**रामस्मरण न सोडा हेचि मायप्रेम ।।१६ ।।**
**अशी बोळवण करुनी कष्टे आज्ञा दे माय ।**
**परी बाळांचा विरहायोगे उचले नच पाय ।।१७ ।।**
**ऐशा समयी बोध करुनिया विरह नाश करिती ।**
**उतराई हे कैसे व्हावे या मायेवरती ।।१८ ।।**
**उतराई हे कधी नच होणे हेचि वसो हृदयी ।**
**गोंदावलीचे माझे आई हेचि मला देई ।।१९ ।।**
**अगाध महिमा काय मी वर्णू प्राकृत अति मूढ ।**
**स्फूर्ती घेऊनी बोळविले ते माते लागे गोड ।।२० ।।**
**बहिणाक्कांनी कृपा करुनिया जोडविली ही माय ।**
**लक्ष्मीयोगे मज ही लाधली वंदितसे पाय ।।२१ ।।**

ज्या बहिणाबाईंच्या कृपेने श्रीअंताजीपंतांना श्रीमहाराजांचे प्रेम,





आशिर्वाद प्राप्त झाले त्या बहिणाबाई श्रीमहाराजांचे अधिकारी शिष्य श्रीहरीभाऊ हरिदास यांच्या भगिनी होत. या बहिणाबाईंचा गौरव सद्‌गुरुलिलामृत या ग्रंथात असा केलेला आहे,

**''यांची भगिनी बहिणाबाई । गुरुचरणी ठेवितां डोई ।**
**सेवा करिता आळस नाही । तिज मायबाप महाराज ।''**

मारुतीरायांचे अवतार असा ज्यांचा अधिकार, त्या श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांची नित्यकीर्तने सन १९०१ मध्ये सांगलीत सुरु झाली. त्यांचे नित्यकीर्तनास श्रीअंताजीपंत जात. कीर्तनात ते झांज घेऊन साथ करीत. प्रसंगोपात श्रीमहाराजांचे सूचनेवरून 'मौज दिसती रे' हे श्रीमहिपतीमहाराजांचे  पद म्हणत व मोठी मौजच होत असे. जे समाधान श्रीक्षेत्र गोंदावले येथे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांची प्रवचने ऐकून होई, तेच समाधान त्यांना सांगलीत श्रीतात्यासाहेबमहाराजांची कीर्तने ऐकून होऊ लागले. नंतर त्यांनी श्रीतात्यासाहेबमहाराजांचेकडून पारमार्थिक मार्गदर्शनही करून घेतले. नित्य साधन उपासना साधून त्यांनी आपला अंत:काळ उत्तमच साधला. सोमवारी दुसऱ्या आषाढी एकादशी दिवशी सकाळी ८ वा भ्रूमध्यावर दृष्टी ठेवून शिवस्मरणात या शिवभक्ताने देह ठेवला.

त्यांचे अधिकारी चिरंजीव श्रीमामामहाराज व त्यांचे अधिकारी नातू श्रीदासराममहाराज यांनी पुढे आचरलेल्या परमार्थाचा पाया श्रीअंताजीपंतांनी केलेल्या संतसेवेने प्राप्त झालेल्या आशिर्वादाने घातला गेला, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. त्यांनी पद्मनाभ जोडला हाच त्यांना प्राप्त झालेला संतदर्शनाचा लाभ होता.

**''संतदर्शनी हा लाभ । पद्मनाभ जोडिला ।।''**

– श्रीतुकाराममहाराज.

## आशिर्वाद सज्जनांचा नाही फुकट जायचा।।

अनेक संतांच्या आशिर्वादाचे फळ श्रीअंताजीपंतांना श्रीमामामहाराजांच्या रुपाने प्राप्त झाले.

श्रीमामामहाराजांसारखे भगवद्भक्त त्यांचे पोटी अवतरले. श्रीमामामहाराजांचे रुपाने त्यांनी पद्मनाभ जोडला होता. प्रत्यक्ष श्रीएकनाथमहाराजांनी श्रीमामामहाराजांचे रुपाने अवतार घेतला. केवढे हे भाग्य श्रीअंताजीपंतांचे !

श्रीमामामहाराजांच्या अवताराचे वर्णन श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर असे करतात,

**''एकनाथ पैठणवाला । सांगली आवडली त्याला ।।धृ ।।**
**पंचक्रोशी ही दत्तप्रभूची ।। कृष्णा वाहे अमृतजलाची ।**
**पावनभूमी तपोवनाची । स्थान पाहुनी धाला ।।१ ।।**
**कुलसंशोधन करिता करिता । केळकरांचे आले चित्ता ।**
**अनंत तनूची घेऊनी सत्ता । राधाकुशी अवतरला ।।२ ।।**
**एकनाथ गोविंद जाहला । हनुमंताची दीक्षा त्याला ।**
**नामरसाचा पिऊनी प्याला । रंगी रंगुनी गेला ।।३ ।।**
**दासबोध हरिपाठ भागवत । ज्ञानेश्वरी रामायण सांगत ।**
**प्रवचन कीर्तन रंगी नाचत । डोलवी श्रोतृगणाला ।।४ ।।**
**पैठण क्षेत्री अतृप्त हेतू । सांगलीत पूर्णेच्छा होतू ।**
**हरिभक्तीचा कळस डोलतू । पांडुरंग मनी भरला ।।५ ।।''**

श्रीमामामहाराज हे उपजत भक्त होते. देवाची पूजा करणे, देवाचे भजन





करणे, देवाची पालखी काढणे हेच त्यांचे लहानपणीचे खेळ होते. श्रीमामामहाराजांचे हे उपजत भगवद्प्रेम पाहून त्यांना श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे दर्शन घडवावे, या हेतूने श्रीअंताजीपंत बुधगाव रेल्वेस्टेशनवर श्रीमामांना श्रीमहाराजांचे दर्शनास घेऊन गेले. या बालगोविंदास श्रीमहाराजांना पाहून आई भेटल्याचा आनंद झाला. त्यांनी श्रीमहाराजांचे कमरेला मिठीच मारली. श्रीमहाराजांनी या लहानशा गोविंदाचे पाठीवरून, तोंडावरून हात फिरवला व म्हणाले, ''रामाला जावे, रामाचे नाव घ्यावे, रामाचे तीर्थ घ्यावे'' एवढे बोलून ते थांबले नाहीत. ते पुढे म्हणाले, ''हा पुढे महासाधू होईल.'' श्रीमहाराजांनी केलेला उपदेश व दिलेला आशिर्वाद या बालगोविंदाचे जीवन आमूलाग्र बदलणारा ठरला. त्यांचे मनात श्रीमहाराजांचे बद्दल किती आदर होता, हे त्यांनी श्रीमहाराजांचेवरून केलेला अभंग पाहिला असता लक्षात येईल. ते म्हणतात, **''ब्रह्मस्वरुप चैतन्य । ते हे सद्गुरु ब्रह्मचैतन्य ।। त्यांचे नाम घेता ओठी । त्यांचे रूप पडता दृष्टी ।। गोविंद म्हणे जीवन्मुक्त । गुरुनामी हे प्रचीत ।।''**

श्रीमामामहाराजांचे लग्नाचे वय झाल्यावर त्यांचे वडिलांनी त्यांचेमागे लग्नाचा लकडा लावला. पण लग्न केले तर हातून परमार्थ होणार नाही, या समजूतीने ते लग्न करावयास तयार नव्हते. श्रीअंताजीपंतांनी फारच लग्नाचा आग्रह धरला. तेव्हा श्रीमामामहाराज त्यांना म्हणाले,'' मी आळंदीला जातो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांना लग्नाबद्दल विचारतो. ते सांगतील ते आपण दोघांनीही ऐकायचे.'' श्रीमामामहाराज आळंदीला गेले. श्रीज्ञानेश्वमहाराजांना नम्रतापूर्वक आपले मनोगत सांगून समाधीपुढील पारावर श्रीज्ञानेश्वरी पारायणास बसले. या बालभक्ताची तळमळ पाहून प्रत्यक्ष चैतन्याचे जिव्हाळा असणारे श्रीज्ञानेश्वरमहाराज प्रकाशरूपाने प्रगट झाले. श्रीमामांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चैतन्य चरणावर मस्तक ठेवले व आपले मनातील हेतू कथन केला. तेव्हा श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणाले, ''बाळ, तू आईवडिलांचे इच्छेप्रमाणे लग्न करून घे.

तुला योग्य गुरूंची गाठ पडेल व तुझा प्रपंचात परमार्थ पुरा होईल.''

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या आशिर्वादाप्रमाणे श्रीमामामहाराजांचा कागवाडच्या श्रीनागेशराव फाटकांची सुकन्या चि.सौ.कां. रंगुताई इचेबरोबर थाटात विवाह झाला. पुढे सन १९०६ मध्ये माघ व.२ या दिवशी श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे सांगणेवरून त्यांनी चिमडच्या श्रीनारायणरावजीमहाराज यांचेकडून रामनामामध्ये पवन साधनेचा अभ्यास समजून घेतला. पुढे १३ वर्षे अखंडीतवाचेने श्रीरामस्मरण सदोदित केले. त्यांची दिनचर्या पाहिली असता हे आपल्या लक्षात आलेवाचून राहणार नाही. हे सदोदित अखंडीतवाचेने केलेले श्रीरामस्मरण पाहून श्रीब्रह्मचैतन्यमहाराज हे श्रीमामामहाराजांचे पोटी श्रीदासराममहाराजांचे रुपाने श्रावण व.६ सन १९२० या शुभदिवशी कुरुंदवाड येथे अवतीर्ण झाले. श्रीरामदासांचे दासराम झाले. 'जेथे नाम आहे. त्याच्या आसपास मी घोटाळत राहतो किंवा ज्याच्या मुखी नाम आहे, त्याच्या हृदयात माझी वस्ती आहे'' ही त्यांची वचने त्यांनी सार्थ करून दाखविली.

श्रीदासराममहाराज हे त्यांचे आईचे उदरात असतानाच त्यांचे आईला– सौ.इंदिरादेवींना मारुतीरायांचे अवतार अशा भ.स.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा अनुग्रह प्राप्त झाला. योगायोग असा की त्याचवेळी प्रल्हादाप्रमाणे श्रीदासराममहाराजांनाही अनुग्रह प्राप्त झाला. **'सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला'** या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाचा प्रत्यय आला. पुढे गणेशचतुर्थीच्या कीर्तनाच्या निमित्ताने श्रीतात्यासाहेबमहाराजांचे कुरुंदवाडला येणे झाले. त्यावेळी श्रीदासराममहाराजांचे आजोबा श्रीअंताजीपंत हेही त्यांचेबरोबर आले होते. ते कोटणीसमहाराजांना म्हणाले, ''महाराज, मला येथे कुरुंदवाडमध्ये नातू झाला आहे, त्याला आशिर्वाद देण्यास आपण आमचे घरी यावे.'' विनंतीप्रमाणे श्रीतात्यासाहेबमहाराज हे घरी आले. १४ दिवसांच्या या नूतन बालकाला त्यांचे मांडीवर देण्यात आले. त्यांनी त्यांचे मस्तकावरून, तोंडावरून हात फिरवला.





त्यांचेकडे कृपादृष्टीने पाहिले व म्हणाले, ''हा बाळ आमचाच आहे, याचे नाव राम ठेवा, हा बालपणापासून कीर्तन करू लागेल.'' सद्गुरुंनी 'हा आमचाच आहे' असे म्हणणे, यापरते भाग्य ते कोणते ? त्यांच्या सांगणेवरूनच भाग्याचे भाग्य 'रामनाम' हे श्रीदासराममहाराजांच्या वाट्याला आले.

पौष वद्य ६, १९२४ या दिवशी श्रीतात्यासाहेबमहाराजांनी महानिर्वाण केले. त्यानंतर प्रतिवर्षीप्रमाणे माघ वद्य १ या दिवशी श्रीमामामहाराजांनी श्रीदासबोध पारायणास आरंभ केला. ते दासबोधपारायण रात्रीचे वेळीच करत. माघ वद्य ३ यादिवशी रात्री १२ चे सुमारास पारायण चालू असताना श्रीतात्यासाहेबमहाराज चैतन्यरुपाने प्रगट झाले. सर्वत्र प्रकाश आणि प्रकाशच दाटून राहिला. 'नवल प्रकाश प्रकाशावेगळा' असाच काहिसा तो प्रकाश होता. त्या चैतन्याच्या प्रकाशाने द्वैत संपूर्णपणे नाहिसे झाले होते व महाराजांची सत्ता काय आहे, याचा अनुभव त्यांना आला होता.

**''हृदया हृदय एक झाले । ये हृदयीचे ते हृदयी घातले ।**
**द्वैत न मोडता केले । आपणा ऐसे अर्जुना ।।''**

या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाचा प्रत्यय त्यांना आला होता. श्रीमामामहाराजांनी कोटणीसमहाराजांचे चैतन्यचरण घट्ट पकडले. त्यावर आपले मस्तक ठेवले आणि म्हणाले, ''महाराज, मी माघ वद्य १ पासून नित्य कीर्तन करावे असा हेतू धरून कीर्तनास प्रारंभ केला आहे. आपण तसा आशिर्वाद दिलात तरच हा माझा संकल्प पूर्णत्वास जाणार आहे.'' श्रीकोटणीसमहाराजांनी कृपादृष्टीने श्रीमामांकडे पाहिले व म्हणाले,''बापूराव, तुमचे हातून ही कीर्तनसेवा माझेप्रमाणेच अखंड चालेल'' असा आशिर्वाद देऊन श्रीकोटणीसमहाराज अंतर्धान पावले. **''ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण। दिधले संपूर्ण माझे हाती ।।''** हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांना आलेला सद्गुरुंच्या उदारतेचा अनुभव

श्रीमामामहाराजांना आलेला होता. श्रीमामामहाराजांना हरिकीर्तनानुग्रह प्राप्त झाला होता.

भ.स.नारायणमहाराज यांचे आज्ञेने त्यांनी साधन व.भ.स.श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे आज्ञेने ‘अखंडीत वाचेने श्रीरामस्मरण –कीर्तन’ अखेरपर्यंत साधले.

श्रीमारुतीरायांचा अवतार अशा श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचा व श्रीकोटणीसमहाराजांचा आशिर्वाद–प्रसाद श्रीमामामहाराजांना प्राप्त झाला व त्यांचे जीवन नाममय होऊन गेले. श्रीमहाराजांच्या उपदेशाप्रमाणे देह विकलांग झालेला असतानासुध्दा शेवटच्या श्वासापर्यंत भगवंतांच्या नामाच्या अनुसंधानात राहिले. शेवटी सकाळी ६ ला नाड्या सुटलेल्या असताना संध्याकाळी ५ या त्यांच्या कीर्तनाच्यावेळी ‘श्रीराम जयराम जयजयराम’ या त्यांच्या महामंत्राचा घोष त्यांनी केला. ‘‘**हरी बोला एकांती । हरी बोला लोकांती । देहत्यागाअंती । हरी बोला ।।**’’ हे नाथमहाराजांचे वचन खरे करून दाखविले व आपण कोण आहोत याची प्रचिती आणून दिली. देहाच्या वाट्टेल त्या अवस्थेत भगवंतांचे अखंड अनुसंधान असणे हेच संतांच्या चरित्राचे खरे वर्म आहे, हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी सांगितलेले संतचरित्रातील वर्म श्रीमामामहाराजांच्या चरित्रात प्रत्ययाला आले. श्रीरामाचे अखंड अनुसंधान हेच खरे श्रीमामामहाराजांचे चरित्र.

**‘‘अखंड ध्यान श्रीरामाचे । अखंड पूजन श्रीरामाचे ।**
**अखंड कीर्तन श्रीरामाचे । हेचि गोविंदचरित ।।’’**

**– गोविंदचरितमानस**

‘हा पुढे महासाधू होईल’ हा श्रीमहाराजांनी बालपणी श्रीमामांना दिलेला आशिर्वाद सत्य ठरला. ‘**आशिर्वाद सज्जनांचा नाही फुकट जायचा ।।**’

卐





## बालपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ।।

सर्वसाधारणत: माणसे उतारवयात परमार्थाला लागतात. पण ही परमार्थाची आवड श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचेपाशी, श्रीदासराममहाराजांचेपाशी उपजतच होती. मागे कित्येक जन्म ते परमार्थाशी सराईत होते. म्हणूनच ही उपजत परमार्थाची आवड त्यांचे ठिकाणी होती.

**‘‘मागा बहुता जन्मी । हेचि करीत आलो आम्ही ।**
**भवतापश्रमी दु:खे पिडिलो । निववू त्या ।।’’**

हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन यातील गुह्य प्रगट करते.

चैतन्यरूप नाम साकार झाले ते ब्रह्मचैतन्यमहाराज. बालपणापासून त्यांचे ठिकाणी या चैतन्यरुप नामाची आवड होती. ध्यान कसे करायचे याचे ज्ञान त्यांचे ठिकाणी उपजतच होते. ते ६ वर्षाचे असताना ध्रुव प्रल्हादाच्या गोष्टी ऐकून आपण पण असेच देवाचे ध्यान करायचे असे ठरवून मध्यरात्री नदीवर एका गुहेत जाऊन ध्यानाला बसले. तेव्हा ते ध्यान कसे करीत होते, याचे वर्णन श्रीसद्‌गुरुलिलामृत असे करते,

**‘‘समाधीचे केले आसन । वरी घातले सिध्दासन ।**
**नासिकाग्री दृष्टी देऊन । रामनाम घेतसे ।।’’**

महाराज घरात नाहीत असे पाहून सर्वत्र शोधाशोध केली असता, ते नदीवरती एका गुहेत ध्यानाला बसलेले आढळले. तू इथे का ध्यानाला बसलास ? असे श्रीमहाराजांना विचारताच ते म्हणाले, ‘‘नदीकाठी अगदी एकांत असतो, तिथे मन नामात लवकर रंगून जाते.’’

शाळेत असताना अक्षर गिरविण्याच्यावेळी श्रीमहाराज इतर मुलांना ‘श्रीराम समर्थ’ असा कित्ता काढून देत आणि तो सर्वांना गिरवायला

सांगत.त्यांच्याबरोबरची भाग्यवान मुले, तेच गिरवत बसायची. मुले खेळायला लागली की श्रीमहाराज त्यांना श्रीरामाचे भजन करायला सांगायचे व स्वत: भजनात रंगून जायचे. ही उपजत रामभक्ती पाहून प्रल्हादाची आठवण व्हायची. हे श्रीमहाराजांचे वेगळेपण त्यांचे आजोबांचे लक्षात आले व ते म्हणाले, 'रावजी ही खरी श्रीपांडुरंगकृपेने लाभलेली अमृतवल्ली आहे. हा कुणीतरी मोठा योगभ्रष्ट पुरुष असावा असे मला वाटते.'

श्रीदासराममहाराज हे श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे आशिर्वादाप्रमाणे वयाच्या ५ व्या वर्षापासून ब्रह्म व माया अशा गूढ विषयावर कीर्तन करीत. देवाची पालखी काढणे, मित्रांसमवेत भजन करणे हेच त्यांचे बालपणीचे खेळ होते. आपले वडील श्रीमामामहाराज यांचे नित्यकीर्तनात आपली छोटीशी विणा अडकवून हे बालराम त्यांना साथ करीत. भक्त प्रल्हादाप्रमाणे त्यांना आईचे उदरात असताना श्रीकोटणीसमहाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला होता. म्हणून ते खरोखर उपजत ज्ञानी होते. त्यांचे ठिकाणी साधन उमटले होते. लहापणापासून ते साधन करीत. साधन म्हणजे काय ? साधनातील येणारे अनुभव , संन्यास आदी गहन विषय त्यांनी ९ व्या वर्षी लिहिलेल्या 'रामदासबोध' या ग्रंथात स्पष्ट केले आहेत.

हे सारे साधनाबद्दलचे असणारे उपजत ज्ञान पाहून त्यांची आई सौ. इंदिरादेवी त्यांना म्हणाल्या, ''रामजी तू साधनाबद्दल येवढे सांगतोस, तू ९ तास साधन करु शकशील का?' हे आईचे उपरोधिक बोलणे ऐकून आपण ९ तास साधन करायचे, या हेतूने सकाळीच हे बालराम आमचे येथे पूर्वी माडीवर असणाऱ्या अंधाऱ्या खोलीत साधनाला बसले. सकाळपासून रामजी कुठे दिसत नाही, म्हणून शोधाशोध सुरु झाली, तेव्हा ते माडीवरती साधनाला बसल्याचे आढळले. ''न सांगता वर जाऊन साधनाला का बसलास ?'' असे त्यांना दटावताच ते आईला म्हणाले, ''तूच नाही का सांगितलेस मला ९ तास साधन





करून दाखवायला?'' तेव्हा आईच्या डोळ्यात आनंदाश्रू आले व ती म्हणाली, ''तू साधन ९ तास करु शकतोस याची माझी खात्री पटली आहे, तू आता खाली चल.''

हे सारे बालपणापासून असणारे अध्यात्मप्रेम पाहून श्रीशंकरमहाराज मिरीकर आमचे घरी आले असताना या बालरामांकडे पाहून ते मामांना म्हणाले, ''हा कुणीतरी योगभ्रष्ट पुरुष असावा, असे मला वाटते.'' श्रीगुरुलिंगगीतेतही श्रीदादांचे बाबतीत असेच म्हटले गेले आहे. ते सोहंसाधनेतच अवतरले. सोहं साधन आयुष्यभर साधले व अखेर सोहंस्वरुपाकार होऊन गेले. हेच त्यांचे खरे चरित्र.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात या दोघांचे वर्णन करावयाचे झाले तर, ते असे करता येईल, **''तैशी दशेची वाट न पाहता । वयसेचिया गावा न येता । बालपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ।।.''**

卐

## भेद ह्य तुटे अभेद उमटे। राम प्रगटे तेचि नवमी।।

खरा भक्त झाल्यावर किंवा खरा योग घडल्यावर – परमात्मरूप झाल्यावर त्या ठिकाणी पंथभेद, संप्रदायभेद, जातीभेद, स्त्री–पुरुष, गरीब–श्रीमंत, विद्वान–अडाणी हे भेद रहात नाहीत.

**''तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शुद्र अंत्यजादी इया ।**
**जाती तवची वेगळालिया । जव न पवती माते ।।''**

हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन हेच स्पष्ट करणारे आहे. म्हणूनच श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे ठिकाणी असा कोणताही भेदभाव आढळत नसे. याचा अनुभव माझे पणजोबा श्रीअंताजीपंत यांनी स्वत: घेतलेला होता. ते म्हणतात,

**''सांप्रदायिकांहूनी इतरावरी प्रेम खूण राही ।**
**लहानथोर हा भेद न तेथे सर्वां समता ही ।।''**

जातीच्या, पंथाच्या, धर्माच्या भिंती कोसळल्याशिवाय आकाशाचा – आत्म्याचा – साक्षात्कार होणार नाही असे श्रीदासराममहाराजांचे सांगणे होते. वागणे होते. सर्व जातीची, पंथाची, धर्माची माणसे श्रीदासराममहाराजांकडे आपलेपणाने येत व त्यांना श्रीदासराममहाराज हे आपलेच वाटत.

**''आपुलेनी भेदेविण । माझे जाणिजे एकपण ।**
**तयाची नाव शरण । मज येणे गा ।।''**

हे ईश्वरीज्ञान श्रीदासराममहाराजांनी अनुभविले होते.

श्रीरामाचा, श्रीरामदासांचा, श्रीदासराममहाराजांचा साक्षात्कार व्हावा असे जर आपणाला वाटत असेल, तर अंत:करणातील अमंगळ भेदाभेद संपूर्ण नाहीसा झाला पाहिजे.

**''भेद हा तुटे अभेद उमटे । राम प्रगटे तेचि नवमी ।।'' – समर्थ**





## आपणासारखे करिती तात्काळ।

वसिष्ठांनी जो आत्मानुभव–आत्मारामाचा अनुभव श्रीप्रभूरामचंद्रांना दिला, तोच अनुभव श्रीसद्गुरु तुकामाई यांनी श्रीगोंदावलेकरमहाराजांना दिला. त्यांना ब्रह्मचैतन्याचा अनुभव दिला व त्यांना ब्रह्मचैतन्य केले. समाधी अवस्था प्राप्त करून दिली. श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांना रामदासी दिक्षा दिली व अनुग्रह देण्याचा अधिकार दिला.

श्रीदासराममहाराजांना प्रल्हादाप्रमाणे गर्भावस्थेत श्रीतात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला. जीवीचा विसावा असे, भाग्याचे भाग्य असे रामनाम त्यांना प्राप्त झाले. म्हणून त्यांचे नाव 'राम' असेच श्रीकोटणीस महाराजांनी ठेवावयास सांगितले. त्यांचे ठिकाणी साधन उपजतच प्रगट झालेले होते – उमटलेले होते. त्यांचे रोमारोमात नाम भिनले होते. म्हणूनच श्रीरामानंदमहाराज खटावकर यांनी त्यांना प्रथम 'प्रल्हाद' असे संबोधिले तर पुढे भ.स.नागाप्पाण्णामहाराज यांचे वचनाप्रमाणे त्यांना श्रूत झालेल्या श्रीगुरुलिंगगीतेत श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांना 'प्रल्हाद' असेच ठिकठिकाणी संबोधिले आहे व त्यांना तुझे साधन परिपूर्ण झालेले असून 'तू आता जगाचा उध्दार करावास' असा स्पष्ट संकेत दिलेला आहे.

सद्गुरु हे शिष्याला तात्काळ आपणासारखेच करतात. **''द्वैत न मोडता केले आपणाऐसे अर्जुना ।।''** असाच तो अनुभव असतो. श्रीतुकाराममहाराज हाच अनुभव असा सांगतात, **''आपणासारखे करिती तात्काळ। नाही काळवेळ तयालागी ।।''**

卐

## जो चिंतिना देहभरण

श्रीब्रह्मचैतन्यमहाराज हे कुलकर्णीपणाचे काम करीत होते. पण त्यांचे मन त्या कामात कधीच रमले नाही. ते आईला एक दिवस म्हणाले, ''आई, या कामाचा मला अगदी कंटाळा आला आहे. मला आता सद्‌गुरुंना भेटावेसे वाटते आहे. म्हणून हे काम मी आता सोडतो.'' येवढे बोलून ते थांबले नाहीत. त्यांनी दुसऱ्या पर्यायी माणसाची व्यवस्था केली व कुलकर्णीपणाच्या कामातून ते मोकळे झाले. श्रीमहाराजांचे वय या सुमारास फक्त २८ किंवा २९ येवढेच होते.

श्रीदासराममहाराज हे सांगली संस्थानात ट्रेझरी ऑफिसमध्ये काम करीत. पुढे संस्थाने विलीन झाल्यावर त्यांची बदली बाहेरगावी होणार, असे त्यांना सांगण्यात आले. जर बाहेरगावी दूरच्या अंतरावर बदली झाली तर श्रीमामामहाराजांचे कीर्तन ऐकावयास मिळणार नाही, याची रुखरुख त्यांना लागली व त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. नंतर त्यांनी जाऊन येऊन करता येईल अशी तासगावला पुरवठा खात्यात नोकरी करण्याचा प्रयत्न केला. पण तेथील वातावरण त्यांनी नोकरी करावी असे नव्हते. सबब त्यांनी तीही नोकरी चार आठ दिवसातच सोडली. त्यावेळी त्यांचे वय अवघे ३१ एवढेच होते. यानंतर मात्र त्यांनी ज्या कीर्तनसेवेची खुणगाठ मनाशी बांधली होती, ती आणि तीच कीर्तनसेवा अखेरपर्यंत केली.

सतत खायची चिंता करणाऱ्या आमच्यासारख्यांना, देह म्हणजे मी असे मानणाऱ्या आमच्यासारख्यांना, देहाचे सतत चोचले पुरविणाऱ्या आमच्यासारख्यांना, अशी सुखाची नोकरी सोडण्याचा विचार करणेसुध्दा अवघड आहे, मग नोकरी सोडणे ही गोष्ट दुरापास्तच!

देहाचे गौणत्व व आत्म्याचे मुख्यत्व त्यांनी जाणले होते, त्यांना





आत्मलाभापेक्षा कोणताही लाभ महत्वाचा वाटत नव्हता, म्हणूनच सद्‌गुरुंची भेट ही कुलकर्णीपणाच्या कामापेक्षा श्रीमहाराजांना कितीतरी मोलाची वाटली, तर श्रीदासराममहाराजांचे दृष्टीने श्रीमामामहाराजांचे नित्यकीर्तन श्रवण करणे, हे नोकरी करणेपेक्षा कितीतरी महत्वाचे ठरले.

**दैवास्तव देहाचे पाळण । ऐसा निश्चय परीपूर्ण ।**

**जो चिंतीना देहभरण । तो महायोगी जाण दैवयोगे ।।**

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ओवी त्यांनी आचरली, म्हणून ते दैवयोगे महायोगी ठरले.

卐

**पतिचिया मता। अनुसरोनी पतिव्रता।।**

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांच्या पत्नी सौ. सरस्वतीदेवी या श्रीमहाराजांच्या परमार्थाला पूरक अशाच होत्या. श्रीमहाराजांसारखे भगवद्‌भक्त पती आपल्याला मोठ्या भाग्याने मिळाले आहेत,आपण मोठ्या भाग्यवान आहोत, असेच त्यांना वाटे. जे महाराजांच्या मनात, तेच त्यांच्या मनात. त्या श्रीमहाराजांचा शब्द कधीही खाली पडू देत नसत. सासूसासऱ्यांची सेवा करून, येणाऱ्या जाणाऱ्यांचे हसतमुखाने स्वागत करून, श्रीमहाराजांचेबरोबर नामस्मरण, भजन यात सहभागी होऊन, त्यांनी श्रीमहाराजांचे अंत:करणात स्थान मिळविले होते. भगवद्‌भजन, नामस्मरण व अन्नदान या तीन गोष्टींनी घराचे मंदीर व्हावे, हा श्रीमहाराजांचा हेतू त्यांनी सफल केला होता.

श्रीमहाराज जेव्हा येहेळगावला आपले गुरू श्रीतुकामाई यांचे दर्शनासाठी चालले, तेव्हा त्यांच्याबरोबर, प्रवास अत्यंत खडतर असूनही, त्या येहेळगावला गेल्या. येहेळगावमध्ये त्या दोघांना पाहून श्रीतुकामाईंना फार आनंद झाला. त्यांनी त्या दोघांना आपलेजवळ आठ दिवस ठेवून घेतले. सूनबाईंचे आचरण पाहून कधी कोणाचे केले नव्हते इतके त्यांचे कौतूक, श्रीतुकामाईमहाराजांनी केले. श्रीमहाराजांचे सद्‌गुरुंनी त्यांचे कौतुक करावे, यातच त्यांचे श्रेष्ठत्व दिूसन येते.

पुढे श्रीमहाराजांनी आपली पत्नी सौ. सरस्वतीदेवी यांचे समवेत नाशिक येथे वास्तव्य केले. नाशिक येथील मुक्कामात सौ. सरस्वतीदेवींनी श्रीमहाराजांचेकडून देहभाव नष्ट करणारे पुरे साधन समजून घेतले. श्रीमहाराजांनी त्यांना सिध्दासन घालणेस शिकविले. श्वासाबरोबर नाम कसे घ्यावे, हा साधनअभ्यास करून घेतला. अहोरात्र साधन साधल्याने त्यांना अन्नपाण्याची आठवणही होत नसे. केवळ आनंद आणि आनंद त्यांनी उपभोगिला.





**''भुकेलिया भूकची खावी ।**
**तहानेलिया तहानची पियावी ।**
**अहोरात्र वावी । मवावा वारा।।''**

या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनाचा त्यांनी अनुभव घेतला. पुढे आपुले सारे आयुष्य श्रीमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे साधनीभूत करून, आपला शेवटला श्वासही श्रीमहाराजांचे पायाचे तीर्थ घेऊन, सिध्दासन घालून, श्वासोश्वासी असणारे श्रीमहाराजांना अभिप्रेत असणारे नाम जपत सोडला. केवढी ही गुरुभक्ती ! याला काही तोड आहे का ?

श्रीदासराममहाराजांचा प्रपंच व परमार्थ सव्यसाचित्वाने पूर्णत्वाला जाण्यात सौ. सीतावहिनींचा वाटा महत्वाचा ठरला. आपले सासरे श्रीमामामहाराज यांचे घरी असणारे नित्याचे कीर्तन, आपले पती श्रीदासराममहाराज यांचेठिकाणी असणारे कीर्तनाचे प्रेम, त्यांच्या चालणाऱ्या अध्यात्मिक चर्चा, प्रसंगी होणारे उत्सव, हे सारे पाहून, हे घर इतर घरांपेक्षा वेगळे आहे, हे त्यांच्या सहजच लक्षात आले. विशेष म्हणजे या साऱ्या गोष्टींशी त्या सहजच समरस होऊन गेल्या. त्यांच्या लहान वयातच त्यांच्यावर घरची सर्व जबाबदारी येऊन पडली. आमची आजी सौ. इंदिरादेवी ही तशी तब्येतीने नाजूक असल्याने बहुतांशी सारे काम सौ. वहिनींनाच करावे लागे. सासूसासऱ्यांची मनोभावे सेवा करणे, आम्हा मुलांची शाळेची तयारी करणे, श्रीदादांसाठी नोकरीला जाणेपूर्वी स्वयंपाक तयार ठेवणे, येणाऱ्याजाणाऱ्यांचे हसतमुखाने स्वागत करणे, उत्सवाची जय्यत तयारी स्वत: करणे, कीर्तनाची तयारी करणे, वेळीच प्रसाद वाटप करणे इत्यादी बहुतसारी कामे सौ. वहिनीच करत. त्यांच्या कामांची यादी करणे हे सुध्दा खरे अवघड आहे. त्यांचा दिवस पहाटे ४ वाजता सुरु होई व रात्री कधीतरी मावळे. पुढे श्रीदासराममहाराजांनी नोकरी सोडल्यानंतर

तुटपुंज्या उत्पन्नात हा सारा व्यवहार व परमार्थ हसतमुखाने, समाधानाने चालवणे हे अवघड काम आमचे श्रीदादा व सौ. वहिनीच करू जाणे. त्यांनी हे सारे कसे चालविले याची मला कल्पनासुध्दा करणे अवघड आहे.

आपल्या उमेदीच्या काळात आपल्या साऱ्या इच्छा आकांक्षा स्वखुषीने बाजूला ठेवून ती आपले पती श्रीदासराममहाराज यांचे परमार्थाला पूरक ठरली, हा तिचा परमार्थ नव्हता काय ? इंद्रियांच्यावर स्वामीत्व असल्याशिवाय इच्छा आकांक्षा बाजूला ठेवता येतील का? देहातीत झाल्याशिवाय इच्छा नाहीशी होईल का ? देहातीत झाल्यावर परमार्थात काय मिळवायचे असते ? साधन करूनसुध्दा जे साधत नाही, ते तिला ती. दादांचे सहवासात सहजच प्राप्त झाले होते. ती. दादांसारखे परमात्मरूप पती मिळाल्याने तिचे भाग्य उजळले होते. मग इच्छा कुठली राहणार ?

**‘‘उजळले भाग्य । दाही दिशा चित्प्रकाश गे ।**
**कृष्ण नवरा झाला । आता कवणाची आस गे ।।’’**

या संतवचनाप्रमाणे तिची अवस्था होती. तिचा प्रपंचातच परमार्थ श्रीमहाराजांनी करून घेतला होता. म्हणून ज्यांना श्रीदासराममहाराज समजून घ्यायचे असतील, त्यांना आधी सौ.वहिनी समजल्या पाहिजेत हेच खरे.

सौ. वहिनींनी नंतर श्रीदासराममहाराजांचेकडून अनुग्रह घेतला. श्वासावर नाम कसे साधावे हे समजून घेतले. त्या रोज पहाटे साधनाला बसू लागल्या. हे साधन त्यांनी आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत साधले. शेवटी गुरुपुष्यामृत, श्रीमामामहाराजांची जयंती हा योग साधून आपले सद्‌गुरु श्रीदासराममहाराज यांना नमस्कार करून ईशचिंतनात आपला देह ठेवला.

सौ. वहिनींनी पतिसेवा, सद्‌गुरुसेवा अखेरपर्यंत साधली व आपल्या





जन्माचे सार्थक केले. श्रीदादा तिच्याबाबत म्हणतात, ‘‘घरातील आणि येणाऱ्या जाणारांचे मनाप्रमाणे वागून, कोणालाही आपल्या आयुष्यात न दुखावता, सर्वांशी चांगले वागून भलेपणा मिळवला. या केळकरांचे घरात त्यांनी किती कष्ट उपसले, त्याला सीमा नाही. त्या एकट्या जे काही करीत होत्या, ते आता शंभरांचे हातूनही होणार नाही, ही अगदी सत्यस्थिती आहे. माझेसाठी तर त्यांनी काय काय केले, हे शब्दाने सांगणे कठीण आणि ते न सांगितलेलेच बरे’’. सद्‌गुरुंनी तिच्या सेवेचे कौतुक करावे, यातच सारे काही आले.

**‘‘स्वधर्म जाणुनी जीवन जगणे । अशी माऊली पुन्हा न होणे’’** हे श्रीबाबुराव गोखलेंनी केलेले तिचे वर्णन अगदी योग्य आहे.

**‘‘गृहिणी भली वंद्य जी सत्कुळी या ।**
**मनी सज्ज जी रामभक्ती कराया ।**
**सदा कर्मयोगा जिने पाळियेले ।**
**सीतामाऊलीला नमिले नमिले ।।’’**

या श्लोकात सौ. सीतामाऊलींचे सारे चरित्रच श्री. केशवकाकांनी गुंफले आहे.

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांच्या पत्नी सौ. सरस्वतीदेवी व श्रीदासराममहाराजांच्या पत्नी सौ. सीतावहिनी यांनी आपले पतीचे मनोगत ओळखून आपले आचरण केले व अनायासे आत्महित साधले.

**पतिचिया मता । अनुसरोनी पतिव्रता ।**
**अनायासे आत्महिता । भेटेची ते ।।**

**– श्रीज्ञानेश्वरमहाराज**

卐

## हरिभक्त विरक्त

अंगी विरक्ती असेल – वैराग्य असेल, तरच परमार्थ होतो. **''वैराग्यापरते नाही भाग्य । वैराग्य नाही ते अभाग्य । वैराग्य नसता योग्य । परमार्थ नव्हे ।।''**

हे समर्थांचे म्हणणे येथे लक्षात घेण्याजोगे आहे. श्रीब्रह्मचैतन्यमहाराज हे असेच विरक्त हरिभक्त होते. श्रीतुकोजीराव होळकर, इंदूरचे अधिपती यांचेकडे श्रीमहाराज गेले असता त्यांनी देऊ केलेली सनद श्रीमहाराजांनी नाकारली व म्हणाले, ''असला माझा मिंधा परमार्थ नाही, मला देणारा राम समर्थ आहे.'' श्रीमहाराजांचा हा निस्पृहपणा पाहून सर्वांना आश्चर्यच वाटले.

श्रीदासराममहाराजांवरील प्रेमाने असेच एका गृहस्थांनी आपला वाडा श्रीदासराममहाराजांचे नावावर करण्याचा कागद त्यांचे हातात ठेवला व त्यातून उत्सवाचा खर्च करावा, असे त्यांनी सुचविले. पण श्रीदासराममहाराजांनी त्यांचे म्हणणे मान्य केले नाही. ''आम्हाला तुमचा वाडा नको आहे, तुम्ही आम्हाला हवे आहात'' असे श्रीदासराममहाराजांनी त्यांना सांगितले. हे ऐकून त्या गृहस्थांना काय वाटले असेल, हे सांगायला नकोच.

सध्या चाललेला पैशावरील परमार्थ पाहिला असता, श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी केलेला, श्रीदासराममहाराजांनी केलेला, हा वैराग्यसंपन्न परमार्थ जास्तच उठून दिसतो व खरा परमार्थ कसा असावा, हे कळल्यावाचून रहात नाही.विरक्त हरिभक्त कसा असतो हे श्रीसमर्थ असे सांगतात,

**''हरिभक्त विरक्त विज्ञानराशी ।**<br>
**जेणे स्थापिले मानसी निश्चयेसी ।**<br>
**तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे ।**<br>
**तया भाषणे नष्ट संदेह मोडे ।।''**

卐





## न गुरोर अधिकं

सद्‌गुरुंशी कसे वागायचे असते हेही आजकाल लोकांना कळत नाही. श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे सद्‌गुरु श्रीतुकामाई यांचे दर्शनासाठी सर्व लोकांसमवेत येहेळगावी गेले होते. श्रीमहाराजांनी बरोबरचे सर्व लोकांना ताकीद केली की येहेळगावामध्ये असेपर्यंत कोणीही त्यांना 'महाराज' म्हणायचे नाही किंवा कोणीही त्यांच्या पाया पडायचे नाही. सद्‌गुरुंचेबद्‌दल किती आदर श्रीमहाराजांचे मनात होता, हे यावरून स्पष्ट होते.

अशीच गोष्ट श्रीदासराममहाराजांचे बाबतीत आम्ही अनुभवली. निंबरगी क्षेत्री भ.स. निंबरगीकरमहाराजांचे समाधीचे दर्शनासाठी आम्ही बरीच मंडळी श्रीदासराममहाराजांचे बरोबर गेलो होतो. त्यावेळीपण श्रीदासराममहाराजांनी आम्हा सर्वांना हेच सांगितले होते की निंबरगीत जोवर आपण आहोत, तोवर कोणीही मला नमस्कार करायचा नाही. अशी निष्ठा सद्‌गुरुस्थानाबद्‌दल पाहिजे. तरच काही परमार्थ घडण्याची शक्यता.

सद्‌गुरुंबद्‌दल, सद्‌गुरुंचे घराबद्‌दल, सद्‌गुरुंचे स्थानाबद्‌दल, अशी काही आत्मियता असायला हवी. सद्‌गुरुंपेक्षा कोणीही मोठा नाही.देवसुध्दा सद्‌गुरुपेक्षा मोठा नाही.

**''गुरुहोनी देव मोठा । जो मानी तो शिष्य करंटा ।''** असे समर्थवचन आहे. तर **'न गुरोर अधिकं'** असे गुरुगीता सांगते.

卐

## मंगलधामी या झालो जंगम आम्ही

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी आसेतूहिमाचल पर्यटन केले. त्यांचा लाखो लोकांशी संबंध आला. त्यात त्यांना कोणी 'आपण कोण' असे विचारणारेही महाभाग भेटत. 'मी जंगम आहे' असे श्रीमहाराज त्यांना उत्तर देत. 'जंगम' म्हणजे चैतन्ययुक्त. श्रीमहाराज चैतन्यरूप झाले, जंगम झाले म्हणूनच ते ब्रह्मचैतन्य ठरले.

आमच्या भ.स. निंबरगीकरमहाराजांना 'गुरुलिंगजंगम' असे संबोधिले जाई. 'गुरुलिंगजंगम' ही एक अध्यात्मातील पदवी आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आपले गुरु श्रीनिवृत्तीनाथ महाराज यांचा उल्लेख 'गुरुलिंगजंगम' असा त्यांचे अभंगात केला आहे. तो अभंग असा,

**''गुरुलिंगजंगम । तेणे दाविला आगम ।**
**आधीव्याधी झाली सम । तेणे पावलो विश्राम रे।।''**

श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या श्रीगुरुलिंगजयजयकार गीतेत संप्रदायातील सर्वच संतांना 'गुरुलिंगजंगम' असे संबोधिल्याचे दिसते. त्याअर्थाने श्रीदासराममहाराज हेही गुरुलिंगजंगमच होते. 'गुरुलिंगजंगम' या शब्दाचा अर्थ श्रीदासराममहाराज असा सांगत, ''गुरु म्हणजे श्रेष्ठ, लिंग म्हणजे आत्मतत्व, जंगम म्हणजे चैतन्ययुक्त' म्हणून गुरुलिंगजंगम याचा अर्थ 'श्रेष्ठ असे चैतन्ययुक्त आत्मतत्व.'

आमचे श्रीदासराममहाराज हे श्रेष्ठ अशा वायुरूप चैतन्ययुक्त आत्मतत्वाशी तादात्म्य पावले होते. श्रीदासराममहाराज आपल्या एका अभंगात हे असे सांगतात, **''वारा झालो या जगासी पाहून हसलो.''**

या श्रेष्ठ आत्मतत्वाचे - श्रीगुरूलिंगाचे - श्रेष्ठत्व श्रीज्ञानेश्वरीमध्ये असे





सांगितले आहे.

**''चैतन्याचिया पोवळी । माजी आनंदाचिया राऊळी ।**
**श्रीगुरुलिंगा टाळी । ध्यानामृत ।।**
**ते तू गुरुलिंगजी माझे । जे येकलेपणीचे विरजे ।**
**जयालागी वोलांडीजे । अद्वैतबोधू ।।''**

जंगम होण्यासाठी आधी मंगलधामी जावे लागते हे श्रीगोपाळनाथ (श्रीगोपाळकाका कोटणीसमहाराज) असे सांगतात, **''मंगलधामी या झालो जंगम आम्ही''**

卐

## सुखे येतो घरा नारायण

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी श्रीगोंदावले येथे मंदिर बांधणेस प्रारंभ केला. पण मंदिरातील मूर्ती कधी आपण आणायच्या, असे जर श्रीमहाराजांना विचारले, तर श्रीमहाराज एवढेच सांगत, ''आपण ज्याचे मंदिर बांधत आहोत, तो आपण होऊनच येईल.''

इकडे तडवळ्याच्या कुलकर्ण्यांनी राम, लक्ष्मण, सीता यांच्या सुंदर मूर्ती करवून घेतल्या होत्या व त्यांच्या मोठ्या वाड्यात त्यांची स्थापना केली होती. पण दुर्दैवाने तो वाडा आग लागून भस्मसात झाला. आगीमध्ये मूर्तींना पण थोडीशी इजा पोहोचली. पुढे असे झाले, कुलकर्ण्यांच्या स्वप्नामध्ये ती करवून घेतलेली श्रीरामाची मूर्ती येई आणि त्यांना सांगे 'तू मला गोंदवल्यास ब्रह्मचैतन्यांच्याकडे नेऊन दे'' हा स्वप्नदृष्टांत त्यांना लागोपाठ तीन दिवस झाला. इकडे श्रीमहाराजांनाही श्रीरामप्रभूंनी आपण येण्याचा संकेत दिला होता. श्रीमहाराज प्रभूरामांची वाटच पहात होते. एवढ्यात हे कुलकर्णी रामाच्या मूर्ती घेऊन आले व त्यांनी त्या मूर्ती श्रीमहाराजांचे स्वाधीन केल्या. श्रीमहाराजांचा आनंद गगनात मावेना.

श्रीरामनिकेतन येथे देखील श्रीरामसीतेच्या मूर्ती या अशाच आपण होऊन आलेल्या आहेत. श्रीरामप्रभू व सौ. सीतामाई यांचेबद्दल श्रीमामामहाराजांचे मनात पहिल्यापासून प्रेम होते – भक्ती होती. ही गोष्ट त्यांचे परमस्नेही श्रीअनंतराव म्हैसकर यांना माहित होती. जमखंडीला श्रीअनंतराव गेले असता त्यांना एका उपेक्षित जागी श्रीरामसीतेच्या सुंदर गारेच्या मूर्ती आढळल्या. त्या मूर्तींची स्थापना श्रीमामामहाराजांचे ठिकाणी उपजत रामभक्ती असल्याने त्यांचेच घरी व्हावी, असे त्यांना मनापासून वाटले व तसे त्यांनी श्रीमामामहाराजांना कळविले. आपले देव श्रीरामप्रभू आपणहून आपल्या घरी येणार, आपले भाग्य उजळणार, याचा आनंद





त्यांना झाला. टाकोटाक सांगलीहून खाडिलकर नावाचे गृहस्थ जमखंडीला गेले व सोवळे नेसून चालत या मूर्ती ते सांगलीला घेऊन आले. मोठ्या भक्तीभावाने या मूर्तींची प्रतिष्ठापना देव्हाऱ्यात करण्यात आली. श्रीरामप्रभूंच्या आगमनाने श्रीहनुमंतसद्गुरुंच्या आज्ञेने सुरु असलेल्या, श्रीमामामहाराजांचे नित्यकीर्तनास अधिकच बहर आला. श्रीरामसीतेच्या मूर्ती श्रीमामामहाराजांना प्राप्त झाल्या. पण अजून श्रीमारुतीरायांचे आगमन झालेले नव्हते.

श्रीमारुतीरायांची मूर्तीही अशीच आमचे घरी आपणहून आली आहे. त्याचे असे झाले, श्रीमामामहाराजांनी **'श्रीराम जयराम जयजयराम'** या त्रयोदशाक्षरी मंत्राचे ३।। कोटीचे पुरश्चरण पूर्ण केले. याप्रसंगी मिरजेतील समर्थशिष्या श्रीवेणाबाई यांचे मठातील तत्कालीन मठाधिपती श्रीरामचंद्रबुवा रामदासी यांनी त्यांना झालेल्या अंत:प्रेरणेनुसार अचानकपणे त्यांचेकडे असलेला, श्रीसमर्थांनी स्वहस्ते दगडात कोरलेला व श्रीवेणाबाईंचे झोळीत रक्षणार्थ अर्पण केलेला प्रसादमारुती भ.स. श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे जेष्ठ चिरंजीव ती.प.पू.श्रीबाबुरावजी कोटणीसमहाराज यांचेसह येऊन ती. प. पू. श्रीमामामहाराजांचे स्वाधीन केला. अशाप्रकारे श्रीसमर्थांनी आमचे ती. प. पू. श्रीमामामहाराजांचेप्रती असणारे प्रेम व्यक्त केले. यानिमित्ताने श्रीरामदासस्वामींचे हातचा मारुती – आमचे कैवारी असणारे पाठिराखे हनुमान, आमचे घरी श्रीरामसीतेसोबत देव्हाऱ्यात प्रतिष्ठित झाले.

अंत:करणात नितांत श्रध्दा, भक्ती असली की आपल्या उपास्यदैवताची अशी अंतर्बाह्य प्रचिती आल्यावाचून रहात नाही.

**''नलगे सायास जाणे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण''** या श्रीतुकाराममहाराजांचे वचनाचा प्रत्यय त्या भक्तास येतो.

卐

## तुका म्हणे पोते। देवे भरले नोहे रिते।।

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांच्या नात्यातीलच एक गृहस्थ होते. गोंदावल्यापासून जवळच ते रहात. त्यांचा मुलगा ५ वर्षांचा असतानाच त्यांची पत्नी निवर्तली होती. घरची अत्यंत गरीबी होती. पण श्रीमहाराजांनी आपल्या घरी यावे व दोन घास भाजी भाकरी खावी, ही त्यांची मनापासूनची इच्छा होती. ही त्यांची मनातील इच्छा जाणून श्रीमहाराज एकटेच त्यांच्या घरी आले. त्यांनी श्रीमहाराजांची पाद्यपूजा केली. श्रीमहाराजांना जी काही घरी थोडीशी भाजीभाकरी केलेली होती, ती मोठ्या अंत:करणपूर्णक श्रध्देने दिली. त्यांनी ती भाजीभाकरी मोठ्या प्रेमाने ग्रहण केली. तेवढ्यात एक गृहस्थ श्रीमहाराज आलेले पाहून त्यांचे दर्शनासाठी आला. श्रीमहाराजांनी त्याचेजवळ पाहुण्यांनी त्यांना दिलेल्या भाजीभाकरीचे मोठे कौतुक केले व त्याला भाजीभाकरी खाणेचा आग्रह केला. अशी १०० ते १२५ माणसे श्रीमहाराजांचे दर्शनासाठी आली. त्या सर्वांना श्रीमहाराजांनी मोठ्या कौतुकाने भाजीभाकरीचा प्रसाद दिला. सर्वांची जेवणे झाल्यावर श्रीमहाराज त्या गृहस्थाला म्हणाले ''अहो, इतकी माणसे जेवली, तुम्हाला काही उरले आहे का नाही ?'' भांड्यामध्ये पाहिले असता आरंभी शिजवलेले अन्न तसेच शिल्लक आढळले. हा श्रीमहाराजांचा अधिकार पाहून त्यांनी श्रीमहाराजांचे पायच धरले.

असाच प्रसंग श्रीदासराममहाराजांचेबाबतीतही घडला. ती.मामामहाराजांचे पुण्यतिथीचे निमित्ताने प्रतिवर्षी महाप्रसाद असे. श्रीदासराममहाराजांची फजिती व्हावी या हेतूने कांही विघ्नसंतोषी लोकांनी गावात ठिकठिकाणी 'आज केळकरांकडे मुक्तद्वार जेवण आहे' असे बोर्ड लावले. परिणामी प्रसादाच्या पंगती संपेनात. आणलेला शिधा संपू लागला. श्रीदासराममहाराजांनी खिरीचा रवा एका पातेल्यातून आणावयास सांगितले. ते





पातेले श्रीमामामहाराजांचे समाधीसमोर ठेवून त्यांनी श्रीमामामहाराजांची प्रार्थना केली व श्रीदासराममहाराजांनी सांगितले ''आता तयार होणाऱ्या खिरीत या पातलेल्यातील रवा घाला आणि स्वयंपाक झाला की पंगती वाढा.'' त्यांनी सांगितल्याप्रमाणे करण्यात आले आणि आश्चर्य, पुन्हा स्वयंपाक करावा लागला नाही. पंगती संपल्यावर पुन्हा अन्न उरले. हे पाहून आम्हा सर्वांना श्रीमामामहाराजांच्या अधिकाराची, श्रीदासराममहाराजांच्या अधिकाराची कल्पना आली. **''तुका म्हणे पोते। देवे भरले नोहे रिते।।''** या श्रीतुकाराममहाराजांचे वचनाचा खरा अर्थ समजला.

卐

## गुरुवाक्यावाचूनि शास्त्र। हाती न शिवे।।

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे लक्षात ठेवण्यासारखे एक मोठे वैशिष्ट्य असे होते की कोणी त्यांना प्रश्न विचारल्यावर, प्रथम चटकन जे उत्तर त्यांच्या तोंडून येई, तेच त्यांचे खरे सांगणे किंवा खरे मत किंवा खरी आज्ञा असे. त्यावर शंका काढून किंवा अडचणी दाखवून पुन्हा विचारल्यावर ते विचारणाऱ्याच्या मनाप्रमाणे सांगत. म्हणून श्रीमहाराज जे प्रथम सांगत तीच गुरु-आज्ञा समजून त्याप्रमाणे वागण्यातच आपले हित असे.

श्रीदासराममहाराज हेच असे सांगत ''माणसाच्या मनात पहिला विचार जो येतो, तो देवाचा असतो. नंतर दुसरा विचार जो येतो तो माणसाचा असतो, तर तिसरा विचार जो येतो तो भुताचा असतो.'' म्हणजेच प्रश्न विचारल्यावर प्रथम जे श्रीदासराममहाराज उत्तर देत तीच देवाची आज्ञा असे, तीच श्रीदासराममहाराजांची आज्ञा असे.

संतवचनावर विश्वास हवा तरच आपले कल्याण - हित होणार. **''संतांचे वचन काही का असेना। मनी घेता जाणा हित होय।।''** हे संतवचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे. म्हणून गुरुवचनाचा महिमा जाणून जो गुरुवचनावर गाढी श्रध्दा ठेवतो, गुरुवचनाशिवाय दुसरे शास्त्र जाणत नाही, तोच परमार्थ साधू शकतो.

**जयाचे वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र ।**
**गुरुवाक्यावाचूनी शास्त्र । हाती न शिवे ।।**

**- श्रीज्ञानेश्वरमहाराज**

卐





## सर्व प्रेमामाजी थोर मातृप्रेम

श्रीब्रह्मचैतन्यमहाराज हे थोर मातृभक्त होते. त्यांच्या मातोश्रींनी देह ठेवल्यावर, ते एवढे धैर्याचे खरे, पण तेही ढसाढसा रडू लागले. त्यांनी त्यांचे आईचे मस्तक मांडीवर घेतले व मुखातून सहजच मातृविरहाचे अभंग बाहेर पडले. ते अभंग असे,

(१)

**दया करी राम सीता । सांभाळावी माझी माता ।**
**दया करी शरयुबाई । मुक्त करी माझी आई ।।**
**हनुमंता कृपा व्हावी । माझी माय पदी न्यावी ।**
**शिवरूपी ब्रह्मगामी । आईवर कृपा करा तुम्ही ।।**
**लोळे देवाचे मी पायी । मुक्त करा माझी आई ।**
**आईचे दोष माझे माथी । येवढी ऐकावी विनंती ।**
**दास म्हणे रघुवीरा । माझी आई मुक्त करा ।।**

(२)

**आता कोठे राहू कोठे जाऊ । आई तुला कोठे पाहू ।**
**तुम्ही जन्म मज दिला । आज कंटाळा हो केला ।।**
**सर्व सुख तुझे पायी । कोठे सोडून गेली आई ।**
**हरिणी पाडस चुकली । मज वेळ तैसी आली ।।**
**माझे दैव कमी झाले । तुज देवे बोलाविले ।**
**दास म्हणे माझा प्राण । तुजवीण झाला दिन ।।**

(३)

**अयोध्यापुरीची ही थोरी । स्वर्गद्वार शरयूतीरी ।**
**तेथे मातेसी आराम झाला । मज राम विसरला ।।**
**हा योग न पहावे डोळा। आला देहाचा कंटाळा ।।**
**दास म्हणे तुम्ही गेला । तेथे नाही नेले मला ।।**

(४)

**आईच्या पोटा जन्मा आलो । काही उत्तीर्ण नाही झालो ।**
**आई  फार व्याकूळ झाली । तिची दया नाही आली ।**
**सोडूनिया आईबापा । तीर्था जाऊन करी पापा ।**
**आता आई रागावली । मज सोडूनिया गेली ।**
**मासामाजी (मार्गशीर्ष शु. ७) भानुवार दिवशी ।।**
**आई गेली वैकुंठासी  ।।**
**दिनदास म्हणे आई गेली । आता दया नाही आली ।।**

श्रीमहाराजांच्या मातोश्री देवाघरी गेल्याची वार्ता अयोध्येत सर्वत्र पसरली. सर्व संन्यासी, बैरागी जमा झाले व अशा सत्पुरुषांच्या साक्षीने त्यांचा अग्निसंस्कार करण्यात आला. त्याचे वर्णन श्रीमहाराज असे करतात.

**साधुसंत वाखाणिती । धन्य धन्य माता म्हणती ।।**
**तुळशी पुष्पांचेही हार । नाम गर्जती अपार।।**
**तेज आले बहु फार । मुख पाहती नारीनर ।।**
**वाद्ये वाजती झणत्कार । होतो नामाचा गजर ।।**
**मागे पुढे साधुमेळा । काय मौजेचा सोहळा ।।**
**दास दु:खी देहधारी। अंतरी आनंदाच्या लहरी ।।**





श्रीदासराममहाराज हेही मातृपितृभक्त होते. श्रीमामामहाराज यांचे बद्दल नितांत आदर त्यांचे मनात होता. दिवसभरात खूपदा ते श्रीमामामहाराजांचे पायावर डोके ठेवून नमस्कार करीत. श्रीदासराममहाराज हे श्रीमामामहाराज यांचे कीर्तनात बालपणापासून साथ करीत. दोघांचाही कीर्तन हाच प्राण होता. श्रीगोविंदजी – श्रीमामामहाराज हे कीर्तननिष्ठेची विनम्र प्रतिमा होते. तर श्रीदासराममहाराज यांनी कीर्तनसेवेची खूणगाठ मनाशी बांधली होती. श्रीमामामहाराजांनी त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवशी नाड्या सुटलेल्या अवस्थेत, त्यांच्या नित्याच्या कीर्तनाच्या वेळी बरोबर ५ वाजता 'श्रीराम जयराम जयजयराम' या महामंत्राचा मोठ्याने उच्चार केला. अखंडितवाचेने श्रीरामस्मरण हे नित्यकीर्तन साधले. श्रीमहाराजांनी केलेली आज्ञा – गुर्वाज्ञा शेवटल्या श्वासापर्यंत साधली. ही गोष्ट त्यांचे मनाला फार चटका लावून गेली. त्यांनी त्यांची श्रीमामामहाराजांचेविषयी असणारी भावना त्यांचे अभंगातून व्यक्त केली आहे. ते अभंग असे,

(१)

**बेचाळीस वर्षे केलेसे जतन । कृपादृष्टी पूर्ण पितृप्रेम ।**
**माझिये मनीचे हट्ट पुरविले । चालविले लळे सर्व काही ।**
**मनी काही आले नाही म्हणितले । ऐसे नाही झाले एकदाही ।**
**चुकलिया रागा नच ही शिवले । ऐसे प्रेम मिळे कोठे आता ।**
**मामांचे प्रेमाचे शब्द या जीवनी। भरले व्यापूनी राम म्हणे ।।**

(२)

**नाही गाठी धन नव्हेची विज्ञान । अंगी नाही गुण सुदृढता ।।**
**परी प्रेम करिती मामा बाळावरी। जपती परोपरी फुला ऐसे ।।**
**गावी कोठे गेलो व्याकूळची व्हावे । ऐसे हे स्वभावे घडो येई ।।**

एक अंत:करण मामांचे पायासी । सुख ते चित्तासी मामांचिया ।।
आई आणि मामा आम्हासी लाभले । पूर ते लोटले परमार्थाचे ।।
हेचि घडो पुढती मागणे मामांना । बालराम चरणा लोळिंगला ।।

(३)

लाभावीण प्रिती प्रेमाचिया जाती । पितृदेव होती ऐसे मामा ।
ऐकुनी कीर्तन सदा समाधानी । सेवा ही करोनी दिली नाही ।
आतील तो राम बाहेरी हा राम । ऐसा मनोधर्म ज्यांचा असे ।।
ऐसे प्रेम कोठे आतुडेल आता । बालराम माथा ठेवी पायी ।।

(४)

नित्य कीर्तनाची साथ ते करावी । आवडी हे जीवी जन्मोजन्मी ।।
मामांना तयाचे कवतूकची वाटे । प्रेम कंठ दाटे सद्‌गदीत ।।
हनुमंतकृपे करिता कीर्तन । मामा समाधान श्रवणी होती ।।
बाळावरी लोटे प्रेमाश्रूंचा पूर । तयाचा विसर केवी होय ।।
कोठले हे शब्द बोलतसे राम । आईस सप्रेम म्हणती मामा ।
ऐसे मामा कोठे दिसतील आता । बालराम माथा वंदितसे ।।

(५)

तुमच्या पादुका ठेवुनी सिंहासनी । रहावे पूजनी ऐसे वाटे ।।
तुमचे कीर्तनी अंबर भरावे । श्रवण घडावे तेचि आम्हा ।।
मामा जरी तुम्ही सांगितला हेत । करावे उचित तेची तुम्ही ।।
तुमचे कीर्तन तुम्ही चालवावे । बालराम भावे वंदितसे ।।





(६)

मामा तुम्ही गेला परी वाटे भ्रम । आहाची परम ऐसे वाटे ।।
जेथोनिया आला तेथेचि निमाला । साक्षात्कार झाला सदोदित ।।
आम्हा ऐसे वाटे तव घडे सर्व । नाही म्हणता उडे मन माझे ।।
मामा म्हणू जाता कोणी न दिसेची । तव विरहाची जाणीव होई ।।
मामा तुमची आता अपार हे शक्ती । तेणेची हे भक्ती बालरामी ।।

(७)

आजवरी होता जिथे । आता वसती केली तेथे ।।
काही काळ दिसत होता । असोनीही परी नव्हता ।।
आता जरी दिसत नाही । भरूनी गेला सर्वांठायी ।।
आपुलाचि राम बाळ । तेथे असो द्या सबळ ।।

मातृपितृभक्ती हा परमार्थाचा पाया आहे. या पायावरच परमार्थाची इमारत उभारली जाते.

卐

## जेथे राम उभा वाचवाया

श्री. भवानराव या नावाचे एक मोठे भावीक श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे जवळ रहात होते. शरीरप्रकृती बळकट असल्याने ते गोंदावले येथे लाकूड फोडण्याचे काम करीत. श्रीमहाराज प्रयागला जाताना त्यांना बरोबर घेऊन गेले होते. श्रीमहाराजांचे सांगणेवरून ते काशीला गेले. काशीत आपल्या हातून नामस्मरण व्हावे या हेतूने ते दशपुत्रे यांच्या ओसाड पडीक वाड्यात राहिले. त्या वाड्यात एक संन्यासी पिशाच्चरूपाने रहात होते. तो वाडा ओसाड होण्याचे हेच एक कारण होते.

एके दिवशी हे संन्याशाचे पिशाच्च या भवानरावांच्या खोलीत आले. काही कारणानी त्या दोघात वादावादी होऊन थोडीशी झटापटही झाली. भवानराव थकून गेले. तेव्हा त्या संन्याशाने भवानरावांना खाली पाडले. त्यांच्या उरावर बसले व त्यांचा गळा दाबू लागले. आता आपली शेवटची वेळ ओढवली असे वाटून त्यांनी मोठ्या कष्टाने, मनापासून श्रीमहाराजांना हाक मारली. श्रीमहाराज प्रत्यक्ष प्रगट झाले व त्यांनी भवानरावांना मृत्यूच्या दाढेतून सोडविले. भक्तरक्षणास श्रीमहाराज किती तत्पर असत, हे यावरून लक्षात येईल.

श्रीदासराममहाराज हे पूर्वी प्रतिवर्षी वैशाख महिन्यात पालघरला जात. तेथे त्यांचे श्रीमंत माईसाहेब दांडेकर यांच्या प्रेमळ विठ्ठलमंदिरात निरूपणाचे कार्यक्रम असत. त्यांचेबरोबर सांगलीहून बंधूवर्य श्रीवसंतराव बापट, श्रीबाळासाहेब गोखले, श्रीधनंजयराव भावे, श्रीमधुसूदनराव परचुरे असे २०-२५ जण साथीसाठी जात. माझे ज्येष्ठ बंधू श्री. चंद्रशेखर (ती. प.पू. आण्णा) व श्री. सूर्यकांत (ती.प.पू. आप्पा) हेही बरोबर जात असत. त्यावेळी ही सर्व मंडळी वयाने खूपच लहान होती. असेच एक वर्षी श्रीदासराममहाराज पालघरला गेले असताना एक विलक्षण घटना घडली. साधारण १९५३ किंवा १९५४ साल





असावे. वैशाखी पौर्णिमेचा दिवस असावा, नेहमीप्रमाणे श्रीदासराममहाराजांचे रात्री १० ते १ निरूपण झाले. निरूपण झाल्यावर ही सर्व मंडळी मंदिराचेवर असलेल्या टेरेसवर झोपावयास गेली. श्रीदासराममहाराज पहुडले. त्यांचे शेजारी इतर ५ ते ६ व्यक्ती झोपल्या व त्यांचेनंतर श्रीवसंतराव बापट हे झोपले होते. म्हणजे श्रीदासराममहाराज व श्रीवसंतराव बापट यांचेमध्ये ५ ते ६ अंथरुणे-गाद्या होत्या. निजानीज झाल्यावर थोड्या वेळाने पश्चिमेकडून 'बापट तिथे झोपला आहे, आपण त्याचेजवळ असे जाऊ' अशा अर्थाची चर्चा श्री वसंतराव बापटांचे कानावर आली. थोड्याच वेळात त्यांचे पायाशी एक काळी आकृती उभी असलेली त्यांना दिसली. साधारण १४ ते १५ फूट उंचीची धिप्पाड, भयप्रद आकृती होती ती! तिने त्यांना सांगितले, 'मी तुला न्यायला आलो आहे, तुझी शेवटची इच्छा काय आहे ?'' हे सारे ऐकून वयाने लहान असलेल्या बापटलालांची घाबरून बोबडीच वळली. थोड्याशा धिटाईनेच ते त्यांना म्हणाले, ''मी दादांच्याबरोबर आलो आहे, त्यांना सांगून येतो.'' खरे पाहिले तर त्यांना हालचालही करता येत नव्हती, ओरडताही येत नव्हते, तरीपण ५ ते ६ अंथरुणे दूर असलेल्या श्रीदादांचेपर्यंत ते कसे पोहोचले, हेच मोठे आश्चर्य आहे. ते दादांचे पायावर धाडकन जाऊन पडले व श्री दादांना 'मी जातो' असे ओरडून सांगितले. बापटलाल अचानकपणे अंगावर पडल्याने व 'मी जातो' असे तो ओरडल्याने श्रीदादांनी श्रीबापटलालांना 'काय झाले आहे? तू का ओरडतोस, तू का घाबरला आहेस' असे विचारले. हा आरडाओरडा ऐकून सर्व माणसे जागी झाली. ती आकृती पूर्णपणे अदृश्य झाल्यावर श्रीबापटलालांनी घडलेला प्रसंग सांगितला. यावर श्रीदासराममहाराज म्हणाले, ''बापटलाल, काळच आला होता पण श्रीमहाराजांनी तुला वाचविले.'' श्रीबापटलाल यांचेवर श्रीदासराममहाराजांचे पुत्रवत प्रेम होते. आम्ही जसे चौघे होतो तसाच बापटलाल त्यांना होता.

**''उदंड मुले नानापरी । वडिलांचे मन अवघ्यांवरी ।।**
**तैसी अवघियांचि चिंता करी । महापुरुष ।।''**

या समर्थवचनाचा अनुभव श्रीदासराममहाराजांचेबाबतीत श्रीबापटलालांना आलेला होता.

ज्याचा सद्‌गुरु पाठिराखा आहे, त्याला शोक व चिंता करण्याचे कारणच काय ?

**''जेथे राम उभा माझा वाचवाया ।**
**कोण गणी वाया संकटासी ।।**

**– श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस.**

卐





## अलौकीक नोहावे लोकांप्रती ।।

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे ठिकाणी 'मी' एक कोणी महाराज आहे, मी एक कोणी वेगळा आहे, मला सर्वांनी वेगळी वागणूक द्यावी, असा भावच नव्हता. ते नेहमी सहज साधेपणाने वागत. एकदा असे घडले, श्रीमहाराज व त्यांचेबरोबर काही माणसे प्रवासाला निघाली होती. आगगाडीत तिसऱ्या वर्गाला गर्दी होती म्हणून बरोबरच्या लोकांनी श्रीमहाराजांना गर्दीचा त्रास नको, या हेतूने त्यांचे दुसऱ्या वर्गाचे तिकिट काढले व त्यांना दुसऱ्या वर्गाच्या डब्यात बसविले व आपण सारे तिसऱ्या वर्गात बसले. श्रीमहाराजांना तेथे चैन पडेना. एक दोन स्टेशन गेल्यावर ते खाली उतरले. तिसऱ्या वर्गाच्या डब्यात आपली सर्व मंडळी जेथे होती, तेथे येऊन बसले. तेव्हा त्यांचे समाधान झाले.

श्रीदासराममहाराज अनेक मंडळींसोबत श्रीक्षेत्र कन्नूर येथे श्रीगणपतरावमहाराजांचेकडे कार्यक्रमासाठी गेले होते. श्रीगणपतरावमहाराजांचे श्रीदासराममहाराजांचेवर अतोनात प्रेम होते. म्हणून त्यांनी श्रीदासराममहाराजांची राहण्याची सोय आपले जवळच्या खोलीत व इतरांची सोय भक्तधाममध्ये केली. श्रीदासराममहाराजांना तिथे बरे वाटेना. ते शेवटी श्रीमहाराजांच्या परवानगीने ही बाकीची मंडळी जेथे उतरली होती, तेथे गेले, तेव्हा त्यांना बरे वाटले.

या संत महात्म्यांचेजवळ आपण कोणी आहोत, याची जाणीवच असत नाही. ते देहीच विदेही अवस्था भोगत असतात. **''असो ऐसा कोठे आठवची नाही । देहीच विदेही भोगू दशा ।।''** या श्रीतुकाराममहाराजांचे वचनाप्रमाणेच त्यांची अवस्था असते. ते स्वत: सन्मार्गाचे आचरण करून लोकांनाही सन्मार्गाला लावतात. पण मी कोणी एक वेगळा अलौकीक पुरुष आहे, याची जाणीव त्यांना स्वत:लाही नसते व ही जाणीव लोकांनाही ते होऊ देत नाहीत. **''मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे । अलौकीक नोहावे । लोकांप्रती ।''**

**– श्रीज्ञानेश्वरमहाराज.**

## कथाश्रवणे नाना नष्ट। संदेह मावळती।।

श्रीब्रह्मचैतन्यमहाराज हे अंतर्ज्ञानी होते. लोकांच्या मनातील हालचाल ओळखून, मनातील शंका ओळखून ते त्या शंकांचे सहजच निरसन करीत. श्रीदामूआण्णा नावाचे एक गृहस्थ मनात काही अध्यात्मिक शंका धरून, त्यांचा खुलासा श्रीमहाराजांचेकडून व्हावा, या हेतूने आले होते. हे ओळखून श्रीमहाराज ते आल्यापासून रोज दुपारी निरुपण सांगू लागले. विषय प्रतिपादनासाठी ते श्रीनाथमहाराजांची एखादी ओवी घेत आणि नाना तऱ्हेच्या शंका आपणच उत्पन्न करून, त्यांची उत्तरे आपणच देत. श्रीमहाराजांच्या या निरूपणातून श्रीदामूआण्णांच्या शंकांचे सहजच निरसन झाले होते. आपण श्रीमहाराजांना शंका न विचारताच सर्व शंकांचे निरसन त्यांनी केले, याचेच श्रीदामूआण्णांना मोठे आश्चर्य वाटले.

श्रीदासराममहाराजांचे नित्यकीर्तनास अनेक माणसे अनेक शंका मनात धरून येत असत. विषय प्रतिपादनासाठी ते श्रीमामामहाराजांच्या नित्यपाठातील प्रतिपाद्य विषयावर अनेक संतांचे अनेक दाखले देत, विवेचन करीत. तेही स्वत: प्रश्न निर्माण करीत व आपणच उत्तरे देत. त्यामुळे सहजच श्रोत्यांच्या मनातील शंकांचे निरसन होत असे.असा अनुभव आमच्या येथे नित्यकीर्तनास येणाऱ्या सर्वच श्रोत्यांचा होता.

**''कलौ कीर्तन वरीष्ठ । जेथे होय ते सभा श्रेष्ठ ।**
**कथाश्रवणे नाना नष्ट । संदेह मावळती ।।''**

या समर्थवचनाचा प्रत्यय श्रोत्यांना येत असे.

वक्ता हा आत्मज्ञानी नि:संदेह असला की श्रोता हा आपोआपच नि:संदेह आत्मज्ञानी होतो.

卐

## दया करणे जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी।।

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे प्रेम सर्वांच्यावर सारखेच होते. अगदी अंतरंगातील शिष्य ब्रह्मानंदमहाराज यांचेपासून सामान्य माणसापर्यंत त्यांची वागणूक सर्वांच्याशी समान असे. सर्वांशीच त्यांचे बोलणे गोड, कळकळीचे, आर्जवपूर्वक, नम्रतापूर्वक, नि:स्वार्थीपणाचे असे. त्यांचे प्रेम कसे असे, त्यांचे बोलणे कसे असे, याचा अनुभव माझे पणजोबा श्रीअंताजीपंत यांनी त्यांचे एका पदात नोंदविला आहे तो असा,

**''काय प्रेम हे गुरुमायेचे न बोलवे वाचा ।**
**अनन्य होता प्रेमपान्हा नावरेचि तिचा ।।**
**किती मधुर ते बोल गोमटे तृप्ती न कधी होई ।**
**सदा मिळावे ऐसी इच्छा श्रोत्रद्वयी राही ।।**
**निरहंकृतीचे सदा बोलणे सहजची उपदेश ।**
**शुध्द भाविका हृदयी बाणुनी फिटती संदेह ।।''**

त्यामुळे सर्वांनाच श्रीमहाराजांचे प्रेम सर्वात जास्त माझ्यावर आहे, असेच वाटे.

श्रीदासराममहाराजांचे वागणे, बोलणे हे सर्वांना प्रेमाचे सूत्राने बांधून ठेवणारेच होते. जिव्हेपाशी असणारे नामाचे सूत्र त्यांनी सांभाळलेले असल्याने ते जगामध्ये जगमित्र असेच होते. सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करणे, कोण्याही जीवाचा मत्सर न करणे हे सर्वेश्वराच्या पूजनातील वर्म त्यांनी जाणले होते. जे स्वत:च्या मुलांवर प्रेम, तेच प्रेम सर्वांवर. म्हणूनच ते महापुरुष ठरले.

**''उदंड मुले नाना परी । वडिलांचे मन अवघ्यांवरी ।**
**तैसी अवघियांची चिंता करी । महापुरुष ।।''**





हे समर्थवचन त्यांना तंतोतंत लागू पडते. म्हणूनच सर्वांनाच असे वाटते की श्रीदासराममहाराजांचे प्रेम माझ्यावरच सर्वात जास्त होते.

ज्याचे चित्त शुध्द आहे, जो सर्वांभूती भगवद्भाव पाहतो, म्हणून ज्याचे वागणे सौजन्यपूर्ण आहे, सर्वांच्यावर प्रेम करणे हा ज्याचा स्थायीभाव आहे, धर्म आहे, तोच असे सर्वांवर सारखे प्रेम करू शकतो.

**''दया करणे जे पुत्रासी। तेची दासा आणि दासी।''** या तुकाराममहाराजांचे वचनाचा अनुभव फक्त तेथेच येतो.

卐

## अधिकार तैसा करू उपदेश

श्रीब्रह्मचैतन्यमहाराज हे ज्याचा त्याचा अधिकार पाहून त्याला उपासना सांगत. ज्याला जे करायला जमेल तेच त्याला ते करायला सांगत. याकारणाने एकाला जे सांगितले, तसेच दुसऱ्याला ते करायला सांगतील, असा नियम नव्हता. व्यक्तीची प्रकृती पाहून त्यांनी उपासना सांगितली. त्यांनी सर्वसामान्य माणसांना माळेवर मौखिक जप करावयास सांगितला व ज्याला जमेल असे वाटले अशा लोकांना त्यांनी श्वासावर नाम साधणेस सांगितले. त्यांचे चैतन्यवाणी या अभंगगाथेत खूप ठिकाणी या श्वासावरील नामसाधनेचा उल्लेख आढळतो. त्यांच्या पत्नी सौ. सरस्वतीदेवी, श्री. हनुमंतराव कुलकर्णी आदी शिष्यांना श्वासावर नाम घेण्यास त्यांनीच सांगितले तर सांगलीच्या श्री. बापूसाहेब साठेंना त्यांनी 'नामस्मरण करावे श्वासोच्छ्वास' असा उपदेश पत्राद्वारे केला आहे. ''मी इतर सर्वांना नामस्मरण करा, अखंड जप करा असे सांगतो. पण अगदी माझे असे जे आहेत त्यांना फक्त अनुसंधान ठेवा म्हणून सांगतो.' हे श्रीमहाराजांचे सांगणे सारे काही स्पष्ट करणारे आहे. असे असताना त्यांनी श्वासावर नाम घेणेस कधीच सांगितले नाही असे म्हणणे धाडसाचे व अन्यायकारी होईल.

श्रीदासराममहाराजांनीसुध्दा लहान मुलांना, ज्यांना श्वासावरील नाम लगेच समजणार नाही, अशांना मौखिक नामाची, बारा अभंग म्हणण्याची, भीमरूपी स्त्रोत्र म्हणण्याची उपासना सांगितली. पण सर्वसाधारणत: त्यांनी हे श्वासावरील तत्वरूप नामच घेण्यास सांगितले. ''**अधिकार तैसा करू उपदेश। साहे ओझे त्यास तैसे देऊ।**'' हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी, श्रीदासराममहाराजांनी तंतोतंत आचरले.

卐





## समर्थांचिया पंक्तिभोजने। तळल्या, वरल्या एकचि पक्वान्ने॥

महाराज म्हणून आपल्याला वेगळे जेवण व इतरांना वेगळे जेवण, हे श्रीब्रह्मचैतन्य महाराजांना कधीच मान्य नव्हते. श्रीरामाचा प्रसाद हा सर्वांना सारखाच प्राप्त व्हावा, हा त्यांचा कटाक्ष होता. पंक्तिप्रपंचाची त्यांना फार चिड होती.

**'समर्थांचिया पंक्तिभोजने । तळल्या, वरल्या एकचि पक्वान्ने ।।'**

हे ईश्वरीज्ञान श्रीमहाराजांचेबाबतीत सर्वांनाच अनुभवायला मिळत असे. उत्सवामध्येसुध्दा आपण सर्वांबरोबर, सर्वांमध्ये प्रसादासाठी बसत व थोडासाच प्रसाद घेत. सर्वांना आपल्या पंक्तिला घेऊन श्रीमहाराजांच्याबरोबर आपण प्रसाद घ्यावा हा भक्तांचा हेतू ते पुरवीत. माझे पणजोबा श्रीअंताजीपंत श्रीमहाराजांच्या या भक्तांवरील प्रेमाचे वर्णन असे करतात,

**''आपुल्या पंक्तित घेऊनी त्यांचा पुरवावा हेत ।**
**काय सोहळा त्या प्रेमाचा देहभावरहित ।।''**

श्रीदासराममहाराज हेसुध्दा उत्सवामध्ये सर्वांचा प्रसाद घेऊन झाल्यावर शेवटच्या पंक्तित दुपारी ३ च्या पुढे आम्हा सर्वांच्याबरोबर अंगणात बसून थोडासाच प्रसाद घेत. आपण कोणी महाराज आहोत, सगळ्यांपेक्षा वेगळे आहोत असे त्यांना कधीही जाणवले नाही.

श्रीरामाच्या दरबारात लहानथोर, गरीबश्रीमंत हा भेदभाव असत नाही. भेदभाव हा सारा माणसापाशी असतो. परमेश्वराचे ठिकाणी, परमेश्वरस्वरूप झालेल्या संतांचे ठिकाणी तो असत नाही.

卐

## राम कर्ता

जगात घडणाऱ्या सर्व घटना श्रीरामरायांच्या इच्छेनेच होत असतात. आपण जे काही बरे वाईट कर्म करीत असतो, त्याचे बरे वाईट फळ जे आपणास मिळत असते, तेही त्याच्याच इच्छेने मिळत असते, अशी श्रध्दा असल्यास सुखदु:खाची बाधाच होत नाही. ''राम कर्ता, खरे कर्तेपण रामाचे'' हा श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे उपदेशाचा गाभा आहे.

''सारे काही श्रीनिंबरगीकरमहाराजांचे हातात आहे, आपले हातात काही नाही, काय करायचे व काय करायचे नाही, हे सारे श्रीमहाराजच ठरवितात.'' असे श्रीदासराममहाराजांचे सांगणे होते, वागणे होते.

**''हे करणे कां न करणे । हे आघवे तोचि जाणे ।**
**हे विश्व चळतसे जेणे । परमात्मेनी ।।''**

हे ईश्वरी ज्ञान त्यांनी अनुभविले होते.

आपण फक्त निमित्तमात्र आहोत. खरे कर्ते श्रीरामराय, श्रीमहाराज आहेत, हा विवेक श्रीब्रह्मचैतन्यमहाराज, श्रीदासराममहाराज यांचेपाशी होता, म्हणूनच त्यांना वैराग्याचे भाग्य प्राप्त झाले.

**''मी कर्ता ऐसे म्हणसी । तेणे तू कष्टी होसी ।**
**राम कर्ता म्हणता पावसी । यश किर्ती प्रताप ।।''**

**– श्रीसमर्थरामदासस्वामी.**





## शरण जावे इतरा । ते काय देणार ।।

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांना रिध्दी, सिध्दी, निधी या उपाधींचे वावडेच होते. श्रीब्रह्मानंदमहाराज गोंदवल्यास असताना श्रीमहाराजांचा वाढदिवस आला. त्यादिवशी श्रीखंड करावे या हेतूने त्यांनी प्रत्येकाकडून थोडे थोडे पैसे गोळा केले. कर्णोपकर्णी ही गोष्ट श्रीमहाराजांचे कानावर आली. श्रीमहाराजांना सर्वांकडून असे सक्तीने पैसे गोळा करणे, ही गोष्ट तितकीशी आवडली नाही. त्यांनी ते सर्व पैसे परत द्यायला लावले. लोकांच्याकडे मागण्याने उपासनेला कमीपणा येतो. आपण फक्त श्रीरामाजवळ मागावे. तो जे देईल त्यात समाधान मानावे, असे श्रीमहाराजांचे सांगणे होते, वागणे होते. **''ठेविले अनंते, तैसेची रहावे । चित्ती असो द्यावे समाधान ।।''** हे श्री तुकाराममहाराजांचे वचन त्यांनी आचरिले होते.

श्रीदासराममहाराजांनीसुध्दा एवढे उत्सव केले, महोत्सव केले, पण कुठे पैशाची मागणी केलेली, पैशासाठी लोकांकडे आवाहन केलेले आपण कधी पाहिले आहे का? त्यांचे सर्व कार्यक्रम मोठ्या स्वरूपात व्हायचे पण त्याचे वर्णन 'घरगुती पण थाटात' अशा शब्दात ते करायचे. त्यांनी आयोजिलेले सर्व कार्यक्रम श्रीनिंबरगीकरमहाराजांनी त्यांचे मनाप्रमाणे साजरे करविले. **''भक्ते जे मनी धरावे । ते देवे आपणची करावे । येथे वेगळे भावावे । नलगे कदा ।।''** या समर्थवचनाचा अनुभव त्यांचेबाबतीत सर्वांनाच येत असे. श्रीमामामहाराजांची जन्मशताब्दी, श्रीनिंबरगीकरमहाराजांची द्विजन्मशताब्दी आदी कार्यक्रम खूप मोठ्या प्रमाणावर साजरे झाले. मोठे मोठे महात्मे या निमित्ताने आले होते. त्यांनी स्वत: जागेला बसून लिलया सर्व कार्यक्रम जबाबदारीने पार पाडले. पण त्याचे श्रेय त्यांनी स्वत:कडे कधीच घेतले नाही. **''सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ।।''** या श्रीतुकाराममहाराजांचे उक्तित ते याचे सर्व श्रेय

श्रीनिंबरगीकरमहाराजांना कीर्तनात जाहीरपणे देत. हे उत्सव पार पाडण्यासाठी, ज्यांची ज्यांची कष्टाने किंवा अन्य स्वरुपात मदत झाली असेल, त्यांचेच कौतुक ते करीत.

भक्तांच्या मनात जे असेल ते मनोरथ पूर्ण करायला श्रीराम, श्रीमहाराज समर्थ आहेत. जे मागायचे ते त्यांचेकडेच मागावे.

**'शरण जावे इतरा । ते काय देणार ।।'** हेच खरे !

卐





## दार घराचे सदैव उघडे। भागवताची ध्वजा फडफडे।।

श्रीब्रह्मचैतन्य महाराजांना खाजगी असे जीवन नव्हतेच. सकाळपासून रात्रीपर्यंत सारखी माणसांची वर्दळ असायची. विशेषत: सणावारी ही गर्दी फारच व्हायची. लोकांची भावना – श्रध्दा असायची, हे जरी खरे असले, तरी शरीर आहे ते शेवटी, शरीराला त्रास हा व्हायचाच. पण श्रीमहाराजांनी कुणाचेही मन मोडले नाही.

श्रीदासराममहाराजांकडेसुध्दा सकाळी ६ पासून लोकांचे येणे चालू व्हायचे, ते रात्री ९ ते १० पर्यंत माणसांची वर्दळ चालूच असायची. संक्रांतीला तिळगूळ देणेसाठी, दसऱ्याला सोने वाटणेसाठी, काही माणसे रात्री ११ वाजता त्यांचा व्याप संपल्यावर यायची. त्याच्यापुढे त्यांचा पाहुणचार श्रीदासराममहाराज करीत असत. दुपारच्यावेळी त्यांचे अध्यात्मिक लेखन चालू असायचे. तेव्हापण माणसे येऊन त्यांना निरनिराळे प्रश्न विचारीत. पण त्यांना या गोष्टींचा त्यांचे लेखनामध्ये कधीही त्रास वाटला नाही, हे केवढे विशेष आहे.

लोकांना खरी विश्रांती प्राप्त व्हावी, समाधान प्राप्त व्हावे यासाठी या संतमहात्म्यांची, या भागवतांची घरे सदैव उघडी असतात.

**''दार घराचे सदैव उघडे । भागवताची ध्वजा फडफडे ।।''**

卐

## विषय तो त्यांचा झाला नारायण।।

अध्यात्मिक गोष्टी बोलायला सुरुवात झाली की श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांना व त्यांचेबरोबरील भक्तांना वेळेचे भान रहात नसे. रात्री सुरु झालेल्या गोष्टी पहाटेपर्यंत चालत.

श्रीदासराममहाराज, श्रीमामामहाराज, मातोश्री सौ. इंदिरादेवी या तिघांनाही श्रीतात्यासाहेबमहाराजांचे विलक्षण आकर्षण होते. तिघांचेही सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराजच. तिघांच्याही अंत:करणात श्रीतात्यासाहेब महाराजांशिवाय विषय असायचा नाही. रात्रीच्यावेळी हे तिघे श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या गोष्टी बोलायला लागले की पहाट कधी व्हायची, हे त्या तिघांनाही समजायचे नाही. असे काही विलक्षण प्रेम होते श्रीमहाराजांबद्दल.

असे काही प्रेम अध्यात्माबद्दल, आपल्या श्रीमहाराजांबद्दल आपले अंत:करणात पाहिजे. तरच काही हाती लागायची शक्यता. ''**विषय तो त्यांचा झाला नारायण। नावडे धन जन मातापिता।।**'' या तुकाराममहाराजांचे वचनाप्रमाणे अवस्था प्राप्त व्हावयास हवी.

卐





## सद्‌गुरुंचे पाय सेवावे। सद्‌गतीकारणे।।

अंताजीपंत नावाचे एक गृहस्थ श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे पाय चेपीत. पाय चेपत असताना अंताजीपंत सहज म्हणाले, ''महाराज तुमचे इतके वय झाले, तरी पोटऱ्या अजून कशा घट्ट आहेत ?'' यावर महाराज हसून बोलले, ''अरे त्यामध्ये भगवंताचे नाम आहे. ते पोकळ कसे असेल ?''

असाच अनुभव श्रीगंगाधरकाका दिक्षीतांना श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचेबाबतीत यायचा. ही गोष्ट श्रीगंगाधरकाकांनी श्रीदासराममहाराजांना अनेक वेळा सांगितली होती.

श्रीदासराममहाराजांचेबाबत असाच अनुभव श्रीदासराममहाराजांच्यावर अतीव निष्ठा असणारे श्रीदत्तात्रेय यशवंत कर्णेकर यांनी घेतला. श्रीकर्णेकर हे श्रीदासराममहाराजांचे नित्यश: पाय चेपीत. पाय चेपताना त्यांना रोज नवीन अनुभव यायचा. कधी श्रीदासराममहाराजांचे पाय मऊ लोण्यासारखे तर कधी अगदी घट्ट लागायचे. पाय चेपताना त्यांचे पायापाशी एक अनामिक सुगंध यायचा.

कायेने, वाचेने, मनापासून भावपूर्वक सद्‌गुरुंची चरणसेवा घडली तरच असे काही अनुभव प्राप्त होतात. सद्‌गती प्राप्त होते.

**''पादसेवन तेचि जाणावे। काया वाचा मनोभावे।**
**सद्‌गुरुंचे पाय सेवावे। सद्‌गतीकारणे।।''**

**– श्रीसमर्थरामदासस्वामी**

卐

## जो आत्मलाभासारखे गोमटे काहीच न देखे।

विजापूरचे श्रीगुरुआप्पा देसाई यांनी गोंदवल्यास येऊन श्रीब्रह्मचैतन्य महाराजांचा अनुग्रह घेतला. श्रीमहाराजांची भावपूर्वक पाद्यपूजा त्यांनी केली. नंतर अत्यंत श्रध्देने गुरुदक्षिणा म्हणून चांदीच्या ताटात एक हजार रुपये घालून ते ताट देसायांनी श्रीमहाराजांना अर्पण केले. श्रीमहाराजांनी ताटाला नुसता हात लावला आणि ते त्यांनी त्यांनाच प्रसाद म्हणून देऊ केले. देसाई ते परत घेईनात. श्रीमहाराजांनी ते धन घ्यावे असा त्यांचा आग्रह होता. त्यांचा फारच आग्रह पाहून श्रीमहाराजांनी त्यातला एक रुपया घेतला व बाकीचे रुपये मात्र त्यांनी श्री. देसायांना परत घ्यायला लावले. श्रीमहाराजांना ऐहिकातील नाशिवंत गोष्टींचा अजिबात मोह नव्हता. सर्वांनी अविनाशी नाम घ्यावे हाच त्यांचा आग्रह होता.

संस्थानी काळात श्रीदासराममहाराजांचे दरबार हॉलमध्ये गणेशोत्सवाचे निमित्ताने कीर्तन आयोजित केले होते. कीर्तनोत्तर नेहमीच्या रिवाजाप्रमाणे सांगली संस्थानचे खाजगी कारभारी श्रीहर्डीकर यांनी श्रीदासराममहाराजांना बरीच मोठी रक्कम कीर्तनाच्या बिदागीच्या स्वरुपात देऊ केली. श्रीदासराममहाराज म्हणाले, ''साहेब, मी कीर्तनाची बिदागी कधीच घेत नाही. मी सेवा म्हणूनच कीर्तन करतो.'' हा श्रीदासराममहाराजांचा निस्पृहपणा पाहून श्रीहर्डीकरांना मोठे आश्चर्य वाटले.

संतमहात्म्यांना या असल्या ऐहिक लाभाचे काहीही महत्व वाटत नाही. त्यांना आत्मलाभापुढे हे लाभ गौणच वाटत असतात. म्हणून त्यांना या असल्या ऐहिक सुखाच्या प्राप्तीने आनंद होत नाही.

**''जो आत्मलाभासारखे गोमटे काहीच न देखे ।**
**म्हणून भोगविशेखे । हरिखे ना जो ।।''**

**– श्रीज्ञानेश्वरमहाराज**





## कृतकृत्य झालो। इच्छा केली ते पावलो।

डॉ. कुर्तकोटी, श्रीमहाराजांचे अधिकारी शिष्य, महाराजांच्या सहवासात नऊ वर्षे राहिले. त्यांनी श्रीमहाराजांनी आपणाला अमूक एखादी गोष्ट हवी आहे, असे कोणाला सांगितल्याचे कधीही ऐकले नाही, हे केवढे विशेष आहे. **''तुका म्हणे माझी इच्छा पूर्ण झाली। काही न राहिली वासना हे।।''** या श्रीतुकाराममहाराजांचे वचनाप्रमाणे त्यांची अवस्था होती. श्रीमहाराज सांगायचे, '' जोवर श्वास आहे, तोवर आस आहे.'' श्री महाराजांचे श्वास सुक्ष्मतर, सुक्ष्मतम झालेले असल्यावर तेथे इच्छा राहीलच कशी ?

श्रीदासराममहाराजांनी कोणाला काही स्वत:करता करायला सांगितले, किंवा एखादी गोष्ट मला आणून दे असे सांगितल्याचे मला स्मरत नाही. आम्हा मुलांकडेसुध्दा त्यांनी काही मागितले नाही, तर इतरांची गोष्ट लांबच. साधनाच्या अभ्यासाने मनोवृत्तीही नाहीशी होते, मन सुखरुप शांत होते. ज्यांचा श्वास सूक्ष्म झालेला होता, जीवन नाकातल्या नाकात वाहात होते, तेथे इच्छा कशी असणार ?

जे भक्त असतात, विभक्त असत नाहीत, त्यांच्या ठिकाणी कोणतीही इच्छा असत नाही. ते देही उदास असतात व जर त्यांचे ठिकाणी इच्छा निर्माण झालीच, तर त्या देव आपणहून पुऱ्या करत असतो. अशा महात्म्यांनाच जीवनात कृतकृत्यता प्राप्त होत असते. तेच असे म्हणू शकतात.

**''कृतकृत्य झालो । इच्छा केली ते पावलो ।।''**

**– श्रीतुकाराममहाराज**

卐

## मरण माझे मरून गेले। मग मी झालो अमर।

श्रीब्रह्मचैतन्य महाराज हे इच्छामरणी होते. संतमहात्मे ज्या कार्याकरिता अवतरलेले असतात, ते कार्य झाले की ते एक क्षणही येथे रहात नाहीत. श्रीमहाराजांनी आपले ईप्सित कार्य झाले आहे, असे समजून देह ठेवायचे ठरविले. निरनिराळ्या प्रकारांनी आपण आता देह ठेवणार ही गोष्टी त्यांनी सूचित केली. पण श्रीमहाराज ही इतकी गंभीर गोष्ट इतक्या सहजपणे हसत खेळत बोलत, त्यामुळे त्याचे गांभीर्य लोकांच्या लक्षात येत नसे. श्रीमहाराजांनी सोमवारी उजाडता, देह ठेवायचे ठरविले. त्याचे आदले दिवशी रात्री श्रीमहाराज भजनासाठी उभे राहिले. **'गावत नाचत वैकुंठ जाना'** म्हणजे काय हे श्रीमहाराजांनी दाखवून दिले. आपले आयुष्यातील शेवटचे क्षण नामाचे महत्व सांगण्यातच त्यांनी घालविले. नित्याप्रमाणेच पहाटे उठून त्यांनी श्रीरामाचे ध्यान केले. ध्यान झाल्यावर श्रीरामाचा निरोप घ्यावा, या हेतूने ते श्रीरामासमोर येऊन उभे राहिले. श्रीरामांना त्यांनी साष्टांग नमस्कार घातला व 'माझ्या माणसांना सांभाळ' असे विनविले. नंतर लोकांना मोठ्याने श्रीरामाचे भजन करा असे सांगून श्रीमहाराज पुन्हा महासमाधी घ्यावी या हेतूने आसनावर ध्यानस्थ बसले. श्रीवामनरावांनी नमस्कार करताच **'जेथे नाम तेथे माझे प्राण । ही सांभाळावी खूण ।।'** असा उपदेश त्यांना केला व अमृत घटका सुरु होताच पहाटे ५ वाजून ५० मिनिटांनी या महात्म्यांनी समाधी अवस्थेत श्वासोच्छ्वासी नामोच्चरणी स्वच्छंद प्रयाण केले.

श्रीमहाराजांनी देह ठेवल्यावरसुध्दा बराच काळ त्यांचे अंग गरम होते. श्रीमहाराजांचा चेहरा अत्यंत शांत, मुद्रा अत्यंत प्रसन्न असून त्यांचे मुखमंडलावर मोठे तेज जाणवत होते. मृत्युची कोणतीच चिन्हे जाणवत नव्हती. ते ब्रह्मनिद्रेत पहुडले आहेत असेच वाटे. हे केवढे विशेष आहे.

ज्यांनी आपले मरण आपल्या डोळ्यांनी पाहिलेले असते, जे





मरणाहीआधी मरून राहिलेले असतात, त्या साधूजनांना मरणाची भिती असत नाही. त्यामुळे त्यांचे निर्याणाचासुध्दा सोहळाच होतो.

श्रीब्रह्मचैतन्य महाराजांच्या निर्याण सोहळ्याचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात,

**ब्रह्मचैतन्य हे ब्रह्माचा आकार ।**
**चैतन्य साकार गोंदावल्यासी ।।१ ।।**

**नामासाठी आले, नामीच राहिले ।**
**नाम गरजले त्रैलोक्यात ।।२ ।।**

**सांगती सकळा करावे भजन ।**
**घातले आसन आपण ते ।।३ ।।**

**श्रीराम श्रीराम त्रिवार उच्चार ।**
**करोनिया स्थिर रामी झाले ।।४ ।।**

**शालीवाहन शके अठराशे पस्तीस ।**
**वद्य दशमीस मार्गशीर्षी ।।५ ।।**

**प्रथम प्रहरी सोमवार दिनी ।**
**श्रीराम होऊनी अमर झाले ।।६ ।।**

**ब्रह्मचैतन्य ते ब्रह्मरूप ठेले ।**
**कीर्तीरुपे उरले दासापाशी ।।७ ।।**

श्रीदासराममहाराज हे सुध्दा इच्छामरणीच होते. आपले सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे आज्ञेने आपले वंशी आलेली, आपले वडील श्रीमामामहाराज यांचे इच्छेप्रमाणे आपले हातून होत असलेली, ही कीर्तनसेवा, या देहात आपले प्राण आहेत तोवर चालावी, ही कीर्तनसेवेची खूणगाठ त्यांनी मनाशी

बांधली होती. ही कीर्तनसेवा अखंडीत व्हावी, या दृष्टीनेच या देहाचे थोडेफार महत्व त्यांना होते. त्यांचे खरे प्रेम मूळस्वरुपावर होते. देहाची आसक्ती अजिबात त्यांचे ठिकाणी नव्हती. वयपरत्वे प्रारब्धाने झालेली मधुमेहासारखी, प्रेशरसारखी, मूळव्याधीसारखी दुखणी त्यांनी कडक पथ्य करून आटोक्यात ठेवली, ती या कीर्तनसेवेसाठीच. पुढे हाताला, पायाला झालेले अस्थिभंगाचे दुखणे, त्यामुळे त्यांच्या हालचालीवर आलेल्या मर्यादा, हे त्यांनी बिनतक्रार हसतमुखाने सोसले. पण कीर्तनसेवा कधीही अंतरली नाही. ते देही असून पूर्ण विदेही होते. **''ते वर्तत दिसती देही। परि ते देही ना माझ्या ठायी। आणि मी तयांच्या हृदयी। समग्र असे ।।''** या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचनाप्रमाणे त्यांची अवस्था होती.

श्रावण शु. ४ मंगळवार दि. २४.७.२००१, या दिवशी श्रीदासराममहाराजांचे नित्याप्रमाणे मंदिरात कीर्तन झाले. श्रावण महिन्यात ते श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हरिपाठावर कीर्तन करीत. **''भावेवीण भक्ती। भक्तीवीण मुक्ती ।''** या अभंगावर नेहमीप्रमाणे उत्साहाने त्यांनी विवेचन केले. हे मंगळवारचे कीर्तन झाल्यावर त्यांना पित्ताचा त्रास होऊ लागला. रात्रभर नीटशी झोप झाली नाही. त्यांना थोडा थकवा वाटू लागला. त्यामुळे त्यांनी २५ तारखेला सकाळी प्रातर्विधी आटोपून काही काळ विश्रांती घेतली. दुपारी ३ वाजता थोडासा आहार घेऊन आपल्याला संध्याकाळी कीर्तन करता यावे या हेतूने पुन्हा काही काळ ते पहुडले.

संध्याकाळी कीर्तनाची वेळ झाली. श्रीदासराममहाराजांची कीर्तनासाठी बाहेर जाण्याची चुळबूळ सुरू झाली. पण त्यांचे शरीर अत्यंतिक थकले असल्याने, त्यांना सरळ उभारणे किंवा दोन पाऊले चालणे हे प्रयत्नानेही शक्य होईना. त्यांना पुन्हा कॉटवर निजवण्यात आले. त्यांना माझे ज्येष्ठ बंधू श्रीचंद्रशेखरआण्णा म्हणाले, ''दादा, मी आज पडवीत बसून तुमचे कीर्तन वाचून



चैतन्यब्रह्म

दाखवितो.'' श्री आण्णांनी बाहेर पडवीत नमन करून श्रीदादांचे नित्याचे कीर्तन वाचून दाखविणेस सुरुवात केली. इकडे दादा मला सारखे विचारीत होते, ''अनिल, कीर्तनाची वेळ झाली की नाही ? कीर्तनास केव्हा जायचे ?'' तेव्हा मी त्यांना म्हणालो, ''दादा, बाहेर आण्णा तुमचेच कीर्तन वाचून दाखवीत आहेत. तुम्हाला ऐकू येते ना ?'' तेव्हा श्री दादा 'हो' म्हणाले. थोड्या वेळाने श्रीआण्णांनी कीर्तन वाचून संपविले. कीर्तनानंतर आरती झाली. कीर्तनाची आरती श्रीदादांनी घेतली. नंतर काय झाले, कळण्यास मार्ग नाही, त्यांनी अचानक उठणेचा प्रयत्न केला. मी त्यांच्या मानेला आधार दिला व विचारले, ''दादा, तुम्हाला उलटी होते आहे काय?'' यावर ते काहीच बोलले नाहीत. कीर्तनावीण आयुष्य त्यांना मान्य नव्हते. म्हणूनच नित्य कीर्तनाचे अनुसंधानात, नित्य कीर्तनानंतर ते नित्यकीर्तनानंद कीर्तनरूप झाले होते. श्वासोच्छ्वासी नामोच्चरणी त्यांनी स्वच्छंद प्रयाण केले होते. **''कीर्तनासी सोडू नये। प्रपंचासी धरू नये ।।''** हा श्रीमामामहाराजांचा उपदेश त्यांनी कडेपर्यंत आचरणात आणला होता. ज्या कीर्तनसेवेची खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली होती, त्या कीर्तनसेवेतच त्यांनी अखेरचा श्वास घेतला होता. केवढे हे कीर्तनप्रेम ! **''आयुष्य करी उणे । परी मज आवडो कीर्तन ।।''** हे त्यांनीच म्हणावे.

कीर्तन-साधन-आचरून त्यांचे अंग हरीरूप झाले होते. म्हणून देह ठेवल्यावरसुध्दा त्यांचे चेहऱ्यावर विलक्षण तेज विलसत होते. कपाळावर लावलेल्या श्रीहालसिध्दनाथाचे भंडाऱ्याने, कुंकवाच्या टिळ्याने ते तेज जास्तच खुलून दिसत होते. बर्फावरती ठेवून देखील पुढे कित्येक तास त्यांचे अंग गरम होते. त्यांचे कपाळाला सारखा घाम धरत होता. घाम टिपला तरी पुन: घाम येत असे हे केवढे आश्चर्य. सर्वश्री मधुकर काटकर, सतेज केळकर, अमित कदम, नंदकुमार कुलकर्णी या सर्वांनी ही गोष्ट जवळून अनुभवली आहे.

देहाशी तादात्म्य असणारी आमच्यासारखी माणसे देहाच्या नाशाबरोबरच नाहीशी होतात. पण देहात असतानाच देहातीत वस्तूरूप झालेले आत्मज्ञानी महात्मे - स्वरुपाकार झालेले आत्मज्ञानी महात्मे - देहाच्या नाशाबरोबर नाहीसे होत नाहीत. ते अजरामर झालेले असतात. ''**असो ऐसे सकळही गेले। परंतु येकचि राहिले। जे स्वरूपाकार जाले। आत्मज्ञानी ।।**'' या समर्थशब्दात किंवा ''**मरण माझे मरूनी गेले। मग मी झालो अमर ।।**'' या श्रीतुकाराममहाराजांचे शब्दात अशा महात्म्यांचे वर्णन करता येते.

卐





## प्रेम नये सांगता, बोलता, दाविता।

आमचे घराण्याचे भाग्य, श्रीमारुतीरायांचे अवतार असे श्रीरामदासस्वामी, श्रीब्रह्मचैतन्य महाराज, श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे प्रेम, आशिर्वाद आमचे घराण्याला लाभले.

श्रीरामदासस्वामी यांनी स्वहस्ते कोरलेला व श्रीवेणाबाईंचे झोळीत त्यांचे रक्षणार्थ अर्पण केलेला प्रसाद मारुती श्रीमामामहाराजांना ३ ।। कोटीचे रामनामाचे पुरश्चरण झाल्यानंतर प्राप्त झाला. आमचे कैवारी हनुमान देव्हाऱ्यात श्रीरामसीतेच्या मूर्तीसोबत प्रतिष्ठित झाले. त्यांचे रूपाने श्रीरामदासस्वामींचे आशिर्वाद आम्हास प्राप्त झाले.

श्रीब्रह्मचैतन्यमहाराज, श्रीतात्यासाहेबमहाराज हयात असताना त्यांनी माझे पणजोबा श्रीअंताजीपंत, माझे आजोबा श्रीमामामहाराज, माझे वडील श्रीदासराममहाराज यांचेवर प्रेमाचा वर्षाव केलाच, पण श्रीमहाराजांनी देह ठेवल्यावरसुध्दा, त्यांचे आमुचे घराण्यावरील प्रेम यत्किंचितही कमी झाले नाही, हे केवढे भाग्य आहे आमुचे! भ.स.तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांनी देह ठेवल्यावर प्रत्यक्ष प्रगट होऊन श्रीमामामहाराजांना अखंड कीर्तनाची आज्ञा दिली. ही गोष्ट श्रीमहाराजांचे श्रीबापुरावांचेवर असणारे प्रेम, श्रीमहाराजांचा श्रीबापुरावांचेवर असणारा विश्वासच दाखविते ना? आजही जे कीर्तन अखंडत्वाने गेली ८८ वर्षे सुरु आहे, ते त्यांचे आमचे घराण्यावर प्रेम आहे, त्यांची कृपा आहे म्हणूनच ना! सातत्याने ८८ वर्षे एखादी गोष्ट होणे, हा चमत्कार नव्हे का ? झाडाला ज्याअर्थी हापूसचे आंबे लगडले आहेत, त्याअर्थी खाली लिंबोणी निश्चित नाही. या दैदीप्यमान कीर्तनपरंपरेच्या पाठीशी श्रीमहाराजांचे आशिर्वाद आहेत. श्रीमहाराजांचे सामर्थ्य आहे. आम्ही फक्त निमित्तमात्र आहोत.

**''ज्ञानी मुक्त होऊन गेले । मागा त्यांचे सामर्थ्य उगेचि चाले । का जे पुण्यमार्गे चालिले । म्हणोनिया ।।''** ही समर्थ ओवी श्रीसमर्थांच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारीच आहे.

श्रीमामामहाराजांनी श्रीतात्यासाहेबमहाराजांचे आज्ञेप्रमाणे जी नित्यकीर्तनाची सुरुवात माघ वद्य१ सन १९२४ या दिवशी केली, ती ब्रह्मचैतन्यमहाराज यांचे साक्षीनेच, हे केवढे विशेष आहे. श्रीमामामहाराजांनी जेव्हा नित्यकीर्तनाची सुरुवात केली तेव्हा आमचे मंदिरात एका खांबाला श्रीमहाराजांचा फोटो व एका खांबाला घड्याळ, या दोनच गोष्टी होत्या. आजही तो श्रीमहाराजांचा फोटो व तेच घड्याळ त्याच खांबाला आहे. या ८८ वर्षांच्या कीर्तनपरंपरेचे श्रीमहाराज हे एकमेव साक्षी आहेत.

श्रीब्रह्मचैतन्य महाराजांचे प्रेम या घराण्यावर आजही आहे. श्रीमहाराजांनी देह ठेवल्यावर ज्यांचे ठिकाणी श्रीमहाराज अविर्भूत व्हायचे, असे श्रीकेतकरमहाराज, जे श्रीवाणीरूपमहाराज म्हणून ओळखले जातात, ते सांगलीला आले की ते आमचे श्रीमामामहाराजांना कधीही भेटल्याशिवाय जात नसत. त्यांचे श्रीमामांचेवर, श्रीदादांचेवर अतीव प्रेम होते. त्यांचे रूपाने श्रीमहाराजांचेच प्रेम आम्हास मिळत होते.

एकवर्षी ते सांगलीला मळेवाले खाडिलकर यांचे दत्तमंदिरात आले होते. खूप माणसे त्यांचे दर्शनासाठी आली होती. श्रीमहाराजांचे प्लँचेट सुरु झाले. श्रीब्रह्मचैतन्यमहाराज त्यांचे ठिकाणी अविर्भूत झाले. श्रीमहाराज म्हणाले, ''या सांगलीमध्ये पाहण्यासारखे काय आहे असे जर कोणी मला विचारील तर मी सांगेन, श्रीबापुरावजी केळकर यांचे घर आहे.'' या श्रीमहाराजांच्या प्रेमाला काय सीमा आहे का ?

सन १९७५ मध्ये श्रीमामामहाराजांचे अखंड कीर्तनाला ५१ वर्षे पूर्ण





झाली तर श्रीदासराममहाराजांचे अखंड कीर्तनाला १३ वर्षे पूर्ण झाली. तेरा या आकड्याचे अध्यात्मामध्ये विशेष महत्व आहे.

**''गोविंद म्हणे तेरा । अंत:करणी नुरवी मेरा ।।''** व **''तेरा अक्षराचे थोर हो सामर्थ्य । प्रगटे समर्थ हृदयामाजी । श्रीराम जयराम जयजयराम । अक्षरे परम हृदयी घेई ।। ऐशा रामनामी रंगोनिया गेला । गोविंद म्हणे त्याला उणे नाही ।।''** या श्रीमामामहाराजांच्या अमृतवाणीतील या 'तेरा' अक्षरांचे महत्व सांगणाऱ्या अमृतवचनांचा प्रत्यय यावर्षी श्रीदासराममहाराजांना आला. ज्या श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी **'श्रीराम जयराम जयजयराम'** हा त्रयोदशाक्षरी मंत्र श्वासोच्छ्वासी अखंडत्वाने जपला, त्या ब्रह्मचैतन्यमहाराजांच्या, त्यांनी स्वत: भजनासाठी, निरुपणासाठी वापरलेल्या चिपळ्यांचा प्रसाद, श्रीदासराममहाराजांना त्यांचे नित्यकीर्तनास १३ वर्षे पूर्ण झाल्यावर आषाढ शु.१४, १९७५ या दिवशी प्राप्त झाला. श्रीरामस्मरण हेच ज्यांचे जीवन होते अशा श्रीदासराममहाराजांना श्रीमहाराजांच्या त्रयोदशाक्षरी रामनामी रंगलेल्या चिपळ्या हे धन तेरा वर्षे अखंड कीर्तन साधल्यावर प्राप्त झाले.

त्याचे असे झाले, श्रीमती चंपूताई गोखले नावाच्या एक स्त्री होत्या. त्यांचे पती त्यांच्या बालपणीच निवर्तले होते. या पतीनिधनाच्या दु:खाचा विसर व्हावा या दृष्टीने त्या श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचेकडे जात. श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांनी त्यांना विरंगुळा वाटावा, त्यांचे मन नामामध्ये रंगावे, या हेतूने आपल्या हातातील चिपळ्या प्रसाद म्हणून दिल्या होत्या. श्रीमहाराजांनी स्वत: भजन करताना वापरलेल्या चिपळ्या आपल्याला प्रसाद म्हणून मिळाल्या आहेत, म्हणून त्यांनी त्या प्राणापलिकडे जतन करून ठेवल्या. त्या पुढे श्रीमामामहाराजांचे कीर्तनालापण येत व नंतर श्रीदासराममहाराजांचे कीर्तनालापण येत. आपला आता वृध्दापकाळ झालेला आहे, हे जाणून त्यांनी हा प्रसाद –चिपळ्या सुरक्षित रहाव्यात म्हणून,

ज्याठिकाणी श्रीमहाराजांचेबद्दल प्रेम आहे, ज्याठिकाणी गेली कित्येक वर्षे अखंडत्वाने कीर्तन सुरु आहे, ज्याठिकाणी या चिपळ्यांचे महत्व आहे, अशा श्रीदासराममहाराजांचे हाती सोपविल्या. श्रीदासराममहाराजांनी विचारले, ''या चिपळ्या कुणाच्या आहेत ?'' तेव्हा चंपूताई म्हणाल्या, ''आपणाला सगळं माहितच आहे. तेव्हा श्रीदासराममहाराजांनी जवळच असलेल्या श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे फोटोकडे हात करून ''यांच्या आहेत ना?'' असे चंपूताईंना विचारले. तेव्हा त्यांनी हे बरोबर ओळखल्याचे चंपूताईंना आश्चर्य वाटले व त्या 'होय' म्हणाल्या. चिपळ्यांच्या रूपाने प्रत्यक्ष श्रीमहाराज भेटल्याचा आनंद श्रीदासराममहाराजांना झाला. सदर घटनेची नोंद स्वहस्ते एका कागदावर करून दोन्ही चिपळ्यांचेवर तो कागद डकविला व त्या चिपळ्या जास्तानी ठेवून दिल्या. प्रतिवर्षी श्रीमहाराजांचे पुण्यतिथीला या चिपळ्यांचे पूजन आमच्या घरी होते.

कीर्तनप्रेमी श्रीदासराममहाराजांना चिपळ्यांच्या रूपाने श्रीमहाराजांचे प्रेम, श्रीमहाराजांचे आशिर्वाद प्राप्त झाले होते. श्रीमहाराजांच्या या प्रेमाचे शब्दात वर्णन करता येईल का ?

**''प्रेम नये सांगता बोलता दाविता ।**
**अनुभव चित्ता चिंतू जाणे ।।''**





## चैतन्यब्रह्म

ब्रह्म हे निश्चळ, गगनासारखे आहे. या निश्चळ ब्रह्माचे ठिकाणी – गगनाचे ठिकाणी वायू हा आहेच. पण तो निश्चळ आहे. या निश्चळ ब्रह्माचे ठिकाणी कल्पना हे चंचळत्व निर्माण झाले. चंचळत्वाने वायुची जाणीव झाली. या चंचळत्वालाच चैतन्य असे म्हटले जाते.

**निश्चळी चंचळ चेतले । म्हणोनी चैतन्य बोलिले ।**
**गुणसमानत्वे जाले । गुणसाम्य ऐसे ।।**

**– समर्थ**

म्हणून चैतन्य हे चंचळ वायुरूप आहे. या चैतन्यातूनच जड विश्वाची निर्मिती होते. म्हणूनच या जड विश्वात चैतन्य जाणविते. निश्चळ ब्रह्मापासून चंचळ चैतन्य, तर चंचळ चैतन्यापासून जड विश्वाची निर्मिती, असा हा विश्वरचनेचा क्रम आहे.

**''जडाचे मूळ ते चंचळ । चंचळाचे मूळ ते निश्चळ ।**
**निश्चळासी नाही मूळ । बरे पाहा ।।''**

**– समर्थ**

हे चंचळ चैतन्य जे सामान्यपणे सर्वत्र पसरले आहे, तेच संतमहात्म्यांचे नाम आहे.

**''तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम ।।''**

**– श्री तुकाराममहाराज**

**''एका जनार्दनी नाम । सुख चैतन्य निजधाम ।।''**

**– श्रीनाथमहाराज**

हे चैतन्यरूपनाम साधनाने नाद, बिंदू, कला, ज्योती या रूपाने अनुभवता येते. नाद, बिंदू, कला, ज्योती हे सारे नामाचेच प्रकर्ष आहेत हे प्रकर्षाने जाणवते. या चैतन्यरूप नामालाच सगुण ब्रह्म समजले जाते.

**''चंचळपणे विकारले । सगुण ऐसे बोलिले ।**
**येर ते निर्गुण उरले । गुणातीत ।।''**

**– समर्थ**

**''नामजपयज्ञु तो परम । बाधू न शके स्नानादी कर्म ।**
**नामे पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थे ।।''**

व

**''घेऊनी येथिचे वर्म । जै विचारिसी हे नाम ।**
**तै केवळ हेचि ब्रह्म । जाणसी तू ।।''**

**– श्रीज्ञानेश्वरमहाराज**

पाण्यावर लाट येते. लाटेतील पाणी व ज्याच्यावर लाट उठली ते पाणी, काही वेगळे असते का ? नाही ना ? तद्वत निश्चळ ब्रह्माचे ठिकाणी कल्पनेने उठलेली लाट – चंचळ चैतन्य ब्रह्मापेक्षा वेगळे असेल का ? चैतन्याचा अनुभव घेता येतो म्हणून ते सगूण ब्रह्म. ब्रह्माचा अनुभव घेता येत नाही. चैतन्याशी तादात्म्य होऊन ब्रह्म होणे हाच ब्रह्माचा अनुभव.

देहाशी तादात्म्य असणाऱ्या आमच्यासारख्यांना, देह म्हणजे मी असे मानणाऱ्या आमच्यासारख्यांना, देहाचे सुखदु:ख सहन करावे लागते. त्यांना चैतन्याची आठवणही असत नाही. जे महात्मे चैतन्यरूप झालेले असतात, ज्यांचे चैतन्याशी तादात्म्य असते, अशा महात्म्यांना देहाची आठवणच असत नाही.

**''देहची होऊनी राहिजे । तेणे देहदु:ख साहिजे । देहातीत होता**





**पाविजे । परब्रह्म ते ।।''** ही समर्थ ओवी हे सारे काही स्पष्ट करणारी आहे.

चैतन्याशी तादात्म्य जाहले म्हणून श्रीमहाराजांचे नाव 'ब्रह्मचैतन्य' असे सद्‌गुरु श्रीतुकामाईमहाराजांनी ठेवले.

**''गुरुदत्त ब्रह्मचैतन्य । नाम असे परममान्य ।**
**चैतन्यब्रह्मी अनन्य । एकरूप जाहले ।।**

**– सद्‌गुरुलीलामृत**

''चैतन्याचा जिव्हाळा(स्त्रोत)'' असे ज्यांचे वर्णन करता येईल, असे श्रीदासराममहाराज होते. म्हणून त्यांचे अंत:करणात चैतन्याबद्दल जिव्हाळा (प्रेम) होता. चैतन्याशिवाय दुसरा विषय त्यांचे अंत:करणात नव्हता. साहजिकच त्यांची कीर्तने चैतन्याभोवती फिरायची. त्यांच्या कीर्तनात चैतन्य जाणवायचे. 'देहाचे विस्मरण आणि केवळ चैतन्याचे स्मरण अशा नामस्मरणाने – सिध्दसाधनाने ते स्वये ब्रह्मरूप झालेले होते. म्हणून त्यांना 'चैतन्यब्रह्म' असेच म्हणावे लागेल. चैतन्यब्रह्माशी तादात्म्य झालेले श्रीब्रह्मचैतन्यमहाराज व श्रीदासराममहाराज हे दोघेही एकरूपच होते. याबद्दल माझे अंत:करणात कोणताही संशय नाही.

卐

## रामदास ते दासराम ते। मूर्ती चैतन्याची।।

ज्यांचा श्रीरामचरणावर गाढा विश्वास आहे, श्रीरामाशिवाय ज्यांना काही दिसत नाही, जे जागृतीत, स्वप्नात, सुषुप्तीत श्रीरामाचाच अनुभव घेतात, आयुष्याच्या रत्नपेटीत जे अनमोल श्वासोच्छ्वास आहेत, जे आयुष्याचे साधन म्हणून ओळखले जातात, ज्यांना समर्थ गोमटी भजनरत्ने असे संबोधतात, त्या भजनात – साधन अभ्यासात जे सतत रंगून गेलेले असतात, त्यांना रामदास किंवा दासराम म्हणतात.

**''म्हणोनी आम्ही रामदास ।श्रीरामचरणी आमुचा विश्वास ।**
**कोसळोनी पडो हे आकाश । आणिकाची वास न पाहू ।।''**

**– श्रीरामदासस्वामी**

**''अंदर राम, बाहीर राम । जहाँ देखे वहाँ राजाहीराम ।**
**जागत राम, सोवत राम । सपनेमें देखो तो राजाहीराम ।।''**

**– श्रीनाथमहाराज**

**''रामावाचूनी अन्य नावडे एकदेशी जाहला ।''**

**– श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर**

**''आयुष्य हेचि रत्नपेटी । माजी भजनरत्ने गोमटी ।**
**ईश्वरी अर्पुनिया लुटी। आनंदाची करावी ।।**
**भजन साधन अभ्यास । येणे पाविले परलोकास ।**
**दास म्हणो हा विश्वास । धरिला पाहिजे।। ''**

**– श्रीरामदासस्वामी**





**''ते काळीच्या धर्मिष्ठा । सोहंहंसाची आत्मनिष्ठा ।**
**हेचि भजन मज वरिष्ठा । तपोनिष्ठा या नाव ।।''**

**– श्रीनाथमहाराज**

**''जो जो भजनी रंगला । तो तो रामदास जाहला ।।''**

**– श्रीरामदासस्वामी**

ही सारी संतवचने एकत्रितरित्या साकल्याने पाहिली असता मला काय म्हणायचे आहे हे लक्षात आल्यावाचून रहाणार नाही.

राम हा खरा कर्ता असून तो जे करील ते आपल्या हिताचेच करील असा विश्वास श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचा श्रीरामप्रभूंच्यावर होता, म्हणून ते प्रभूरामाचे दास – रामदास ठरले. तर आपला प्राण – कर्मकर्ता आत्मा हाच राम आहे असा विश्वास श्रीदादांचे ठिकाणी होता म्हणून ते 'दासराम' ठरले. ते आपले एका पदात म्हणतात,

**''रामा तूचि प्राण ।।धृ ।। स्थिरचर तोही तूचि ।**
**जे जे दिसते ते ते तूचि । सोडू नको मज जाण ।।''**

श्रीरामचरणी विश्वास असणारे रामाचे दास, रामदास व दासराम, अखंड श्रीरामस्मरणाने, रामरूपी अंतरात्म्याचे दर्शन होऊन रामरूप झाले खरे, पण त्यांनी रामाचे भजन सोडले नाही, रामाची कथा सोडली नाही. ते रामरूप झाले होते पण त्याची जाणीव त्यांचे ठिकाणी नव्हती. ते जाणीवरहित जाणते होते. ते साधनाने सिध्द झाले पण त्यांनी साधन सोडले नाही.

**''तो सीध परी करी साधन । सर्वकाळ रामचिंतन ।**
**ध्यानधारणा अनुष्ठान । चुको नेदी ।।''**

**– समर्थरामदासस्वामी**

**''आधी होता संतसंग । तुका झाला पांडुरंग ।**
**त्याचे भजन राहीना । मूळस्वभाव जाईना ।।''**

**– श्रीतुकाराममहाराज**

परमात्मरूप झाल्यावरही त्यांनी मूळस्वभाव – भजन सोडले नाही, म्हणून ते देवाचे लाडके भक्त ठरले.

**''मग यावरीही पार्था । माझा भजनी आस्था ।**
**तरी तयाते मी माथा । मुकूट करी ।।''**

**– श्रीज्ञानेश्वरमहाराज**

ते परमात्मरूप झाल्यावरही त्यांनी रामाची सेवा, रामाचे दास्यत्व सोडले नाही, ते रामदास, दासरामच राहिले.

**''ऐसे मीच होऊनी पांडवा । करिती माझी सेवा ।**
**परी नवलावो तो सांगावा । असे आईक ।।''**

**– श्रीज्ञानेश्वरमहाराज**

अशा दासाचे, रामदासाचे, दासरामाचे दास्य स्वत: राम करतात.

**''देव दासाचे दास्य करी । निजानंदी रंग भरी ।।''**

**– निजानंद**

दासराम व रामदास हे शब्द दोन आहेत पण अर्थ एकच आहे. श्रीदासरामांना ९ व्या वर्षी झालेला बोध 'रामदासबोध' या नावाने प्रसिध्द झालेला आहे. यातच सारे काही स्पष्ट होत आहे.

श्रीरामदास (श्रीब्रह्मचैतन्यमहाराज) व श्रीदासराम हे काही दोन नाहीत याची अनुभूती श्रीचंद्रकांत हणमंत कुलकर्णी यांनी घेतली. त्या अनुभवाचे वर्णन ते असे करतात,





ती. सद्गुरु श्रीदासराममहाराज यांची कृपादृष्टी माझ्यावर असल्यामुळे मी आजपर्यंत अनेक संकटातून/आजारातून सुखरूप पार झालो आहे. ती. दादांच्यामुळे माझ्या जीवनाला एक नवी दिशा, एक नवे वळण मिळाले.

नोकरीच्या निमित्ताने मी सांगलीत राहात होतो. निवासाची जागा ती. दादांच्या रामनिकेतनजवळ असणे हे माझे भाग्य होते. मला माझ्या आजोळकडून सद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांच्या विषयी श्रध्दा व भक्ती मिळाली. हा वारसा मला माझ्या भाग्याने मिळाला. कसबे डिग्रज येथे ती. दादांचा कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी दादा मला नवीन होते. परंतु कीर्तन असलेने मी तेथे गेलो. मी म्हटले किंवा माझ्या मनात असे आले की, ती. दादा आता त्यांच्या परंपरेनुसार कीर्तन करणार. त्यात सद्गुरु ब्रह्मचैतन्य महाराजांचा उल्लेख येईल का? एवढे मनात यायचा अवकाश, माझे लक्ष ती. दादांच्याकडेच होते. अचानक त्यांची माझी दृष्टादृष्ट झाली आणि ती. दादांनी सद्गुरु श्री ब्रह्मचैतन्य महाराजांची गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. मी त्यावेळेपासून ती. दादांचा भक्त झालो.

हे काहीच नाही. नोकरी निमित्ताने मी सांगलीत राहात असताना रामनिकेतन जवळ राहण्याची जागा होती. ११ वाजता कामासाठी जाणेचे असलेने मधल्या वेळेत सकाळी ९ वाजता मी नित्यनियमाने दादांच्याकडे जात असे. ती. दादा सकाळी बाहेर येऊन आसनस्थ झाल्यावर कोणीकोणी अभंग वगैरे म्हणत, त्यावेळी मीही तेथे हजर असे. अचानक एके दिवशी (साधारण सन १९९२ चा काळ असावा) ती. दादा म्हणाले, तू ही काहीतरी म्हण. मला ही संधी मिळाली. मी नेहमी 'रामहृदय' मधील काही श्लोक म्हणत असे. त्यातील श्लोक म्हणावे म्हणून मी सुरुवात केली. एक श्लोक झाला पण पुढील श्लोक आठवे ना. दोन तीन वेळा मी प्रयत्न करून पाहिला. पण काहीच आठवेना (मला हे सर्व येते याचा मला अभिमान, गर्व झाला होता. असाच त्याचा अर्थ होता. तो नाहीसा करण्यासाठी ती. दादांनी माझ्यावर अशी कृपादृष्टी केली.) काय करावे काही सुचेना. मी

ती.दादांच्याकडे पाहिले. ते ही माझ्याकडेच पाहात होते. दृष्टादृष्ट झाली. माझ्या डोळ्यातून अश्रूधारा वहात होत्या. अभिमान गळाला होता. मीपण संपले होते. तसाच उठलो आणि ती. दादांच्या चरणी मस्तक ठेवले आणि ती. दादांनी माझ्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेवला. त्याचक्षणी मला ती. दादांच्या जागी सद्गुरु श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे साक्षात दर्शन झाले. ती. दादा व ब्रह्मचैतन्यमहाराज हे एकच आहेत याची खात्री पटली.

ती.दादा त्यावेळी मला म्हणाले, काय झाले बाळा ? ठीक आहेस ना ? घाबरू नको. श्रध्दा ठेव. मी ती. दादांना म्हटले, ''दादा ! मी चुकलो. क्षमा करा....'' सर्वांग थरथरत होते. एक वेगळा अनुभव होता. मला जसे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे दर्शन झाले तसेच त्यावेळी जे कोणी हजर होते त्यांनाही झाले. श्री. दत्तात्रय कर्णेकर यांनाही असाच त्यावेळी अनुभव आला. मी धन्य झालो. त्यादिवसापासून ती. दादा मला श्री. सद्गुरु ब्रह्मचैतन्य महाराजांची आरती म्हणण्यास सांगत.

माझे परमभाग्य म्हणून अशा संताची भेट झाली. ''पूर्वजांच्या पुण्यकोटी, संग्रही असलिया गाठी, तरीच ऐशियांची भेटी – होय जना ।।'' हेच खरे.

ती. दादांच्या चरणी साष्टांग दंडवत....

।। श्री सद्गुरुचरणार्पणमस्तु ।।

हा त्यांना आलेला अनुभव त्यांनी आरतीच्या रुपात काव्यबध्द केला आहे. ती आरती अशी,

**''विनम्र भावे उजळूनी हाती नयनांच्या ज्योती ।**
**दासराम हो सद्गुरु तुम्ही स्वीकारा आरती ।।**
**तुम्हीच माझे राम हृदयी या नसे कुणी अन्य ।**





**तुम्हीच माझे सद्गुरुसम हे 'ब्रह्मचैतन्य' ।**
**परतुन येईल कैसी मग ती संसाराची भ्रांती ।।१ ।।**
**चंद्रकोर ही शोभून दिसते नभांगणी या स्थित ।**
**कीर्तनरंगी तुम्हीच दिसता 'रामदास' निश्चित ।**
**अमृतवाणी ऐकून तुमची असंख्यजन ते उध्दरती ।।२ ।।**
**चंद्रकांत चरणाशी वंदी, तुम्हावीण व्यर्थच ते जगणे ।**
**वरदहस्त ठेवावा आम्हा अन्य नसे मागणे ।**
**रामनाम हे सदैव राहो आम्हा सर्व चित्ती ।।३ ।।''**

असाच अनुभव श्री. एल. के. कुलकर्णी यांनाही आला. त्यांना आलेला अनुभव त्यांनी काव्यात गुंफला आहे. ते काव्य असे,

**।। श्री राम समर्थ ।।**

**मंगलमूर्ती गणपती । सकल गुणांचा अधिपती ।**
**मुळारंभ उत्पत्ती । मुळारंभ जो ।।१ ।।**
**सहस्त्ररश्मी मती प्रकाश । तू स्फूर्ती किरणांचा ईश ।**
**शब्दा स्फुरण द्यावे विशेष । मजला तुवा ।।२ ।।**
**स्फुरणरूप स्वयं अंबा । चैतन्य चराचरी देशी आरंभा**
**सकलविद्या समारंभा तुची एक ।।३ ।।**
**ऐशी माया शारदा वंदिली । लेखनकार्य प्रगट झाली ।**
**जे बोलवीन बोल वेल्हाळी । बोलेन मी ।।४ ।।**
**सद्गुरु परब्रह्म केवळ । मी तो त्यांचा लडीवाळ बाळ ।**
**तयापुढे करीतो शब्द खेळ प्रेमळपणे ।।५ ।।**

तया खेळाये कौतुक । देखणे दाखविती नेक पाहोजात ।
मी बालक । स्नेहाळ देखती ।।६ ।।

नामामृताचा ब्रह्मसिंधू । का नामची अवतरले ते मधू ।
प्रगटले विश्वानंदू । ब्रह्मचैतन्य हे ।।७ ।।

सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य महाराज । श्री समर्थांचे नाम तेज ।
नाम लेणे ल्याले साज । नाम श्रीमंत जे ।।८ ।।

ऐसिया ब्रह्मचैतन्य सद्‌गुरुंची । पावन पुण्यतिथी प्रतीवर्षाची ।
साजरी होते बहु साची । रामनिकेतनी ।।९ ।।

ब्रह्मचैतन्य पुण्यतिथी दिनी । पर्वकाळ रामनिकेतनी ।
चिपळ्या भावे पुजोनी । ठेविल्या साच्या ।।१० ।।

महाराज भजन नित्य करीत । चिपळ्या घेऊन हातात ।
भजनि रघुवीर प्रगटत । भावबळे ।।११ ।।

महाराजांच्या पवित्र चिपळ्या । आपसुक दादांना मिळाल्या ।
नित्यकीर्तन सोहळा । चाले म्हणुनी ।।१२ ।।

श्री घुंगुर्टे यांचे प्रवचन । श्री दादा ऐकती तन्मय होऊन ।
श्रोते ऐकती सर्वजन । चरित्र महाराजांचे ।।१३ ।।

श्रीदादांना नमस्कार करुनी । प्रवचनास बैसलो जाऊनी ।
स्मितहास्य केले दादांनी । मजकडे पाहुनी ।।१४ ।।

भावभक्तीने भरे अंतर । श्रीमहाराजांची पाहता तस्वीर ।
नाम कल्होळे सत्वर । अंतर भरीले ।।१५ ।।





तव ते दादा दिसले समोर । तोच महाराज दिसती साचार ।
वंदीले मनोमनी सत्वर । भावबळे ।।१६ ।।

श्री दादांचे ठाई बैसले । श्री महाराज स्वये दिसले ।
शहारले अंग सगळे । स्वानंद बळे ।।१७ ।।

अंगी कफनी भगवी दिसे । तुळशी माळ करी वसे ।
व्याघ्रासनी बैसले दिसे । दासबोध पुढती ।।१८ ।।

मनोहर हास्यवदन । कृपा कटाक्ष स्नेह नयन ।
कुबडी कुक्षी घेऊन । मजकडे पाहती ।।१९ ।।

ते वेळी नामघोष कल्होळे । जागा जाहलो ते वेळे ।
श्रीदादा समोर दिसले । स्मितवदनी ।।२० ।।

प्रवचन संपले पाहुन । आरती प्रसाद घेऊन ।
नमस्कारिती भक्तजन । श्रीदासरामचरण ।।२१ ।।

मी ही उठलो झणी । वंदीले गुरुचरण दोन्ही ।
महाराज दिसती अजुनी । नयना पुढती ।।२२ ।।

श्रीदादा वदले ते वेळी । महाराज दिसलेना जवळी ।
दर्शन इच्छा पूर्ण झाली । तुम्हाप्रती ।।२३ ।।

ऐसे सद्‌गुरुंचे महिमान । जाणो न शकती सर्वजन ।
म्हणोनी जवळी असोन । आकळेना ।।२४ ।।

घरी दासबोध वाचिता । प्रश्न मनी उमटता ।
कीर्तनी जावोनी बैसता । उत्तर मिळे ।।२५ ।।

प्रश्न टरफल होय दुरी । अर्थ आकळे अंतरी ।
जीवनी भिने निर्धारी । अपसुखपणे ।।२६ ।।

श्रीरामनिकेतनी बैसता । दूर होती सर्व चिंता ।
श्रीरामकीर्तन ऐकता । चिंता दूर जाती ।।२७ ।।

ऐसे महिमान सद्‌गुरुंचे । कैसे वर्णू माझे वाचे ।
चारी वाचा मौनाचे । गुज कळे ।।२८ ।।

हरी कीर्तनाची गंगा । पावन करी अंतरंगा ।
वारी भव भय भंगा । भरता अंतरी ।।२९ ।।

सद्‌गुरु रामदास माऊली । बालपणापासुनी सावली ।
मज दिनास पावली । कृपेकरुनी ।।३० ।।

सद्‌गुरु गुरुलिंग स्वामी । कृपा केली मजसी तुम्ही ।
म्हणोनिया आलो धामी । रामनिकेतनी ।।३१ ।।

श्रीगुरुहनुमंत सद्‌गुरु देव । चरणी त्यांच्या ब्रह्मभाव ।
आपआपला दाविती ठाव। कैवल्यधामी ।।३२ ।।

श्रीदासराम ब्रह्म आगळे । सोहंभावे भाविले ।
विश्व व्यापोन सोवळे । मजला दिसले ।।३३ ।।

अनुभव अनुभवा आले । एकमेकी ते विराले ।
विरोन तद्रुप झाले । एकाएकी ।।३४ ।।

श्रीगुरुकृपा अनुभव । प्रेमे कथिला निजभाव ।
चरण पादुका निज ठेव । लाभे मजला ।।३५ ।।





ब्रह्मचैतन्य पुण्यतिथी । पौष वद्य दशमी तिथी ।
भक्तीज्ञान उजळे ज्योती । भक्ता हृदयी ।।३६ ।।

## महाराज धन्य आजि जहालो हो। प्रभू आपल्या दर्शने।।

श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे चरित्र वाचले असता श्रीदासराममहाराजांचे चरित्र डोळ्यासमोर उभे राहते व श्रीदासराममहाराजांचे चरित्र वाचताना डोळ्यासमोर श्रीमहाराजच उभे राहतात यातच सारे काही आले आहे असे वाटते.

श्रीमहाराजांचे माझे पणजोबा श्री अंताजीपंत यांचेप्रती असणारे प्रेम, माझे आजोबा श्रीमामामहाराज यांना प्राप्त झालेला श्रीमहाराजांचा आशिर्वाद, श्रीमहाराजांच्या उपदेशाप्रमाणे त्यांचे शेवटल्या श्वासापर्यंत असणारे नामाचे अनुसंधान, 'जेथे नाम आहे, तेथे मी आहे' हे श्रीमहाराजांचे सांगणे हे सारे लक्षात घेता, श्रीमामामहाराजांचे ठिकाणी सतत असणाऱ्या नामानुसंधानामुळे श्रीमामामहाराजांचे पोटी श्रीमहाराजच अवतीर्ण झाले, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

श्रीमहाराजांचे ठायी बालपणापासून असणारे अध्यात्मप्रेम, त्यांचे आकर्षक व्यक्तीमत्व, बुध्दीमान तरुणांना या परमार्थाकडे आकर्षून घेण्याची त्यांचे ठिकाणी असणारी शक्ती, नामाचे महत्व लोकांना पटो न पटो, पुन:पुन: त्यांना समजावून सांगणेची त्यांचेजवळ असणारी चिकाटी, त्यांचे सर्वांशी मित्रत्वाने वागणे, गुरुत्वाला विसरून त्यांचे शिष्यांशी वागणे, शिष्यांचे जवळ असणाऱ्या छोट्याश्या गुणांचा मोठा गौरव करणे, ज्यांना कोणाचाही आधार नाही त्यांना आधार देणे, कोणीही कसाही असो त्याच्याशी तुटकपणे न वागता त्याला जोडणे, शिष्यांच्या शंकांचे निरसनार्थ त्यांना कधीही भेटणे, त्यांचे पैशापासून लांब रहाणे, त्यांचा प्रभूरामांचेवर असणारा गाढा विश्वास, त्यांचेठायी असणारी मातृभक्ती, त्यांचे सर्व सांप्रदायिकांवर असणारे सारखे प्रेम, त्यांची देहाबद्दल असणारी अनासक्ती, त्यांचेठायी असणारी गुरुभक्ती इत्यादी श्रीमहाराजांचे ठायी असणारे गुण आम्हास श्रीदासराममहाराजांचे जवळही अनुभवण्यास मिळाले.





श्रीदासराममहाराजांचे रूपाने श्रीमहाराज आमचेत वावरत होते. आमचे भाग्य म्हणून श्रीदासराममहाराजांचे रुपाने श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे दर्शन आम्हास घडले.

**''महाराज धन्य आजि जाहलो हो । प्रभू आपल्या दर्शने ।।''**

卐

## ।। आरती श्रीसद्गुरुंची ।।

जय जय आरती श्रीगुरुराया। सद्गुरुराया।
नमितो तव पदी संवरी माया।।ध्रु।।

मी जीव हा भ्रम द्वैतपसारा।
वारुनि दिधला अद्वैत सारा।।१।।

परमपरात्पर चिन्मय खाणी।
शतमुख स्तविता मंदली वाणी।।२।।

जगज्जीवन प्रभु मंगलधामा।
नामरुपातीत तू अभिरामा।।३।।

## ।। आरती श्रीमामामहाराजांची ।।

आरती गोविंदा। नित्य कीर्तनानंदा।।
सच्चिदानंदकंदा। गुरुलिंग साधुबोधा।।ध्रु।।

हनुमंतसद्गुरुआज्ञे। केले अखंड कीर्तन।
सर्वस्व वेचियेले। समर्पिले पंचप्राण।।१।।

ब्रह्मचैतन्यादी संत। भाऊराव समर्थ।
रामचंद्रनारायण। नाम बोधी हे कथीत।।२।।

श्रीराम जयराम जयजयराम। तेरा अक्षरे परम।
संदेश निर्वाणीचा। पायी लोळे दासराम।।३।।





## ।। आरती श्रीदासराममहाराजांची ।।

आरती रामराया। करी कृपेची छाया।
दावोनी दीनी दया। धन्य धन्य महाराया।।ध्रु।।

सद्गुरु हनुमंत। पिता गोविंद संत।
बोधी गुरुलिंग सिध्द। धरुनि रूप सिध्दानंद।।१।।

सिध्द साधनाने। स्वये ब्रह्मची झाले।
भावादरे केशवाने। चरणी मस्तक ठेविले।।२।।

## संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १. | श्री. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज चरित्र आणि वाङमय | के.वि.बेलसरे |
| २. | श्रीसद्‌गुरु लीलामृत | कै. गो. वि. फडके |
| ३. | चैतन्यपत्रे | डॉ. सौ. आशा म. परांजपे |
| ४. | अध्यात्मसंवाद भाग १ ते ४ | संकलन : म. वि. केळकर |
| ५. | श्रीदासराममहाराज चरित्रामृत | डॉ. के. वा. आपटे |
| ६. | अनंतअमृत स्मरण पद्यावली | श्री. चं. रा. केळकर |

अभंगगाथेत ठिकठिकाणी या श्वासोच्छ्वासी असणाऱ्या नामाचा उल्लेख करतात. ते अभंग खालीलप्रमाणे,

१) **सर्व सोडोनिया आस । राम जपा श्वासोच्छ्वास ।**
**तेणे तरसील खास । स्वामीवचन हे ।।**

२) **न लगे मानवाची आस । जपा नाम श्वासोच्छ्वास ।।**

३) **नाम श्वासोच्छ्वासी वसे । तेथे ब्रह्म उभे असे ।।**

४) **नका करू हो आळस । राम जपा श्वासोच्छ्वास ।।**

५) **नका धरू काही आस । राम जपा श्वासोच्छ्वास ।।**

तर श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस या सोहंहंसाचे महत्व असे सांगतात,

**''हंसावरती राम बैसोनी चालिले हो पुढती ।**
**हंस कसा मग उड्डाण करतो खाली आणि वरती ।।१ ।।**
**खाली येता सवे उडतसे कोण जाणे गती ।**
**प्राणी निजला तरी हंस हा न सोडी निज स्थिती ।।२ ।।**
**हंस गगनीच्या मुक्तामाळा देई आणुनी हाती ।**
**अगणित तारे त्यात चमकती नाना रंग ज्योती ।।३ ।।**
**डोळे झाकुनी पाहसी जरी तू स्वरूप दिसे पाही ।**
**बाप सद्गुरु कृपा करील हा लाभ घडे देही ।।४ ।।**

या अखंडीतवाचेने केलेले श्रीरामाचे अखंडीतस्मरण हेच त्यांचे नित्यकीर्तन होते. ते म्हणतात, **''अखंडीत वाचे श्रीरामस्मरण । हेचि पै कीर्तन दासालागी ।।''**

श्रीरामदासस्वामी हे श्रीमारुतीरायांचे अवतार होते, असा अनुभव श्रीरामदासस्वामींचे अधिकारी शिष्य कल्याणस्वामी असा नोंदवितात,





**''साक्षात शंकराचा । अवतार मारूती ।**
**कलिमाजी तेचि झाली । रामदासाची मूर्ति ।।''**

असाच अनुभव श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे बाबतीत त्यांचेच अधिकारी शिष्य ब्रह्मानंदमहाराज असा व्यक्त करतात,

**''माझे सद्गुरुराव मारुती अवतार ।**
**कोणी हो संदेह धरू नये ।।**
**दया ती पहावी सद्गुरुनाथाची ।**
**समर्थाचे परी शोभतसे ।।''**

श्रीतात्यासाहेबमहाराज यांचेबाबतीत हाच अनुभव सद्गुरु पंतमहाराज बाळेकुंद्री यांचे अधिकारी शिष्य प्रेमयोगी श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर आपले पदात असा नोंदवितात,

**''त्रेतायुगी हनुमंते सेवा रामाची केली ।**
**नैष्ठिक ब्रह्मचर्य आचरुनी किर्ती गाजविली ।।धृ ।।**
**रामावाचुनी अन्य नावडे एकदेशी जाहला ।**
**सर्व जग हे रामरुपची मानेना बोला ।।१ ।।**
**त्रेतांती श्रीहनुमंताने राम प्रार्थियला ।**
**संसाराचा अनुभव काही नाही मज मिळला ।।२ ।।**
**सर्वदेशी तुज अन्वयदृष्टी कैसे सेवावे ।**
**आपण तरुनी इतरजनांना कैसे तारावे ।।३ ।।**
**राम म्हणे कलियुगात मानव होऊनी कार्य करी ।**
**रामदास गोंदविले बाबा आवृत्ती दुसरी ।।४ ।।**